महाराष्ट्राचे निडर दैनिक

# शौर्य मराठी

वर्ष : – १ ले अंक :– ०६ शनिवार दि. ९ नोव्हेंबर २०२४ पान :– ४ किंमत ५ रु. जळगाव


## जम्मू–काश्मीर विधानसभेत पुन्हा गदारोळ, भाजप आणि एनसी आमदारांमध्ये खडाजंगी

श्रीनगर जम्मू–काश्मीर विधानसभेत शुक्रवारी चौथ्या दिवशीही प्रचंड गदारोळ पाहायला मिळाला.

जम्मू–काश्मीर विधानसभेत भाजप आणि नॅशनल कॉन्फरन्सच्या आमदारांमध्ये कलम ३७० च्या मुद्द्यावरून पुन्हा हाणामारी झाली.खासदार इंजिनिअर राशिद यांचे बंधू आणि अवामी इत्तेहाद पक्षाचे आमदार खुर्शीद अहमद शेख यांनी आज पुन्हा कलम ३७० पुन्हा लागू करण्यासंदर्भात पोस्टर दाखविण्याचा प्रयत्न केला. त्यावेळी भाजपच्या आमदारांनी खुर्शीद अहमद शेख यांना रोखले.

यावेळी समर्थक आणि विरोधक आमदारांमध्ये बाचाबाची झाली.विधानसभेत झालेल्या गदारोळात मार्शल यांनी खुर्शीद अहमद शेख यांना सभागृहाबाहेर काढले. तसेच, मार्शल यांनी भाजपच्या काही आमदारांनाही सभागृहाबाहेर काढले. त्यानंतर भाजपच्या सर्व नेत्यांनी सभात्याग केला. दरम्यान, कालही जम्मू–काश्मीर विधानसभेत कलम–३७० रद्द केल्याच्या मुद्द्यावरून प्रचंड गोंधळ झाला. यावेळी समर्थक आणि




विरोधक आमदार परस्परांना भिडले. यात भाजपचे तीन आमदार जखमी झाले आहेत.

सभागृहात गोंधळ सुरू होताच विधानसभा अध्यक्षांनी कामकाज काल दिवसभरासाठी तहकूब केले. सभागृहात कलम–३७० संदर्भात बॅनर फडकावल्याने वातावरण तापले आणि गोंधळ सुरू झाला. याचबरोबर, काल जम्मू–काश्मीर विधानसभेत केंद्रशासित प्रदेशाला पुन्हा विशेष दर्जा देण्यासंबंधीचा प्रस्ताव बुधवारी मंजूर झाला होता. त्याच्या निषेधार्थ जम्मूत गोरखा समुदायाने जम्मूत तीव्र निदर्शने केली. उपमुख्यमंत्री सुरिंदर कुमार यांचा पुतळाही जाळला.

गोंधळाचे निमित्त ठरले बॅनर खासदार इंजिनिअर राशिद यांचे बंधू आणि लंगेटचे आमदार खुर्शीद अहमद शेख यांनी सभागृहात कलम–३७०चे बॅनर फडकावले. हे बॅनर पाहून भाजप आमदार भडकले आणि त्यांनी बॅनर हिसकावून घेत फाडून टाकले. यात समर्थक व विरोधक आमदार परस्परांशी भिडले

## जातीजातीत समाज विखुरला जावा; SC, ST, OBC समाज एकजूट राहू नये हा काँग्रेसचा डाव; नरेंद्र मोदी

धुळे – धुळे येथील जाहीर सभेत मोदींनी काँग्रेस आणि त्यांच्या मित्रपक्षांवर घणाघात केला. पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले की, SC, ST आणि OBC कमकुवत राहावा असेच काँग्रेसला नेहमी वाटते. राजीव गांधी यांनी ओबीसी आरक्षणाचा उघडपणे विरोध केला होता. जर एससी, एसटी आणि ओबीसी हा समाज एकजूट झाला तर काँग्रेसच्या राजकीय दुकानदारीचं शटर बंद होईल असं त्यांना वाटत होते. राजीव गांधीनंतर आता कुटुंबाची चौथी पिढी या धोकादायक प्रवृत्तीने त्यांचे युवराज काम करत आहेत. काँग्रेसचा एकमेव अजेंडा आहे,



कुठल्याही प्रकारे एससी, एसटी, ओबीसी समाजाची एकजूट तोडावी असंही त्यांनी म्हटलं.

त्याशिवाय SC समाज विविध जातीत विखुरला जावा, जेणेकरून त्यांची सामुहिक शक्ती कमी पडेल. ओबीसी समाजही वेगवेगळ्या जातीत विभागला जावा जेणेकरून ओबीसींची एकजुटता कायम राहिली तर त्यांची ताकद वाढेल. ही ताकद वाढू नये म्हणून ओबीसी समाजाला जाती जातीत विखुरण्याचा प्रयत्न केला जात आहे. एसटी समाजही वेगवेगळ्या जातीत विभागला जावा. आदिवासी, दलित, मागासवर्गीय समाज एकत्रितपणे एकजूट पुढे आले आहे. ते मजबुतीने त्यांचा आवाज उचलू नये त्यासाठी त्यांना जातीत विखुरले जावे हा काँग्रेसचा डाव असल्याचा गंभीर आरोप पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केला.

दरम्यान, काँग्रेस छोट्या छोट्या जातींना एकमेकांशी लढवत आहे. आदिवासींची ओळख, दलितांची एकता हे तोडण्यामागे काँग्रेस लागली आहे.

## व्होट जिहादच्या मुद्यावरुन राजकारण तापलं किरीट सोमय्यांची निवडणूक आयोगाकडे तक्रार

मुंबई– महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भारतीय जनता पक्षाने मुस्लिम संघटनांकडून महाविकास आघाडीच्या समर्थनार्थ सुरू असलेल्या निवडणूक प्रचाराबाबत अनेक प्रश्न उपस्थित केले आहे. या संपूर्ण प्रकरणात मतांचे ध्रुवीकरण होत असल्याचा आरोप भाजपने केला आहे. तसेच, अल्पसंख्याक समाजाला स्वत:कडे आकर्षित करण्यासाठी अनेक प्रकारची आश्वासने दिली जात असल्याचे भाजपचे म्हणने आहे.

अशातच, महाराष्ट्रातील मराठी मुस्लिम सेवा संघाचे एक पत्र समोर आले असून, त्यात त्यांनी महाविकास आघाडीला मतदान करण्याचे आवाहन केले आहे. संघटनेचे एक पत्रही समोर आले आहे, ज्यात त्यांनी काही मागण्या



केल्या आहेत. यातील अनेक मागण्या वादग्रस्त असल्याचा आरोप भाजपचा आहे. याप्रकरणी भाजप नेते किरीट सोमय्या यांनी निवडणूक आयोगाला पत्र लिहून, या संस्थेसह इतर अनेक संस्थांवर कारवाई करण्याची मागणी केली आहे.

मराठी मुस्लिम सेवा संघचे आवाहन

१. ज्यांनी शेकडो निरपराध मुस्लिमांची हत्या केली, त्यांना तुम्ही मत द्याल का? २. ज्यांनी अलिगड मुस्लिमांकडून हिसकावून घेतला, त्यांना तुम्ही मत द्याल का? ३. मुस्लिमांवर समान नागरी कायदा लागू करणाऱ्यांना तुम्ही मतदान कराल का? ४. मदरसे रद्द करण्याचा विचार करणाऱ्यांना तुम्ही मतदान कराल का? ५. वक्फच्या विरोधात असलेल्यांना तुम्ही मत द्याल का? ६. ज्यांनी आमच्यावर CAA, NRC लादले, त्यांना तुम्ही मत द्याल का? ७. जे आमच्या मुलींच्या डोक्यावरून हिजाब काढतात, त्यांना तुम्ही मत द्याल का? ८. मशिदीत घुसलेल्या व्यक्तीच्या पाठीशी उभ्या असलेल्या पक्षांना तुम्ही मत द्याल का? ९. जे आमच्या मुस्लिमांच्या वस्त्या बुलडोझरने उद्ध्वस्त करतात, त्यांना तुम्ही मत द्याल का? १०. आपले बहुमोल मत देऊन महाविकास आघाडीला यशस्वी करा. किरीट सोमय्यांची सोशल मीडियावर माहिती

## सरकारी कर्मचाऱ्यांविरोधात खटल्यापूर्वी परवानगी अत्यावश्यक

नवी दिल्ली : कर्तव्यावर असताना मनी लाँड्रिंगचा आरोप असलेल्या लोकसेवकांविरुद्ध खटला सुरू करण्यापूर्वी सरकारच्या संबंधित प्राधिकरणाची मंजुरी घेणे आवश्यक आहे असे सर्वोच्च न्यायालयाने एका खटल्या दरमयान म्हटले आहे.

न्यायालयाने सांगितले की सीआरपीसीच्या कलम १९७ (१) नुसार सरकारी अधिकारी आणि न्यायाधीशांविरुद्ध खटला चालवण्यासाठी सरकारची मंजुरी घ्यावी लागेल अशी तरतूद आहे. ही तरतूद आता प्रिव्हेन्शन ऑफ मनी लाँडरिंग ॲक्ट (पीएमएलए) मध्ये देखील लागू झाली आहे. वास्तविक, ईडीने आंध्र प्रदेशचे नोकरशहा बिभू प्रसाद आचार्य यांच्यावर मनी लाँड्रिंगचे आरोप दाखल केले होते.



जे तेलंगणा उच्च न्यायालयाने २०१९ मध्ये सरकारच्या मंजुरीशिवाय खटला चालवल्याबद्दल नाकारले होते. याविरोधात ईडी सर्वोच्च न्यायालयात पोहोचली होती, जिथे बुधवारी न्यायमूर्ती अभय एस. ओक आणि न्यायमूर्ती एजे मसिह यांच्या खंडपीठानेही याचिका फेटाळली. न्यायालयाने म्हटले की, पीएमएलए अंतर्गत खटला चालवण्यापूर्वी सरकारची परवानगी घेण्याची तरतूद प्रामाणिक आणि निष्ठावान अधिका–यांना संरक्षण देण्यासाठी आहे.

## तुमचा शत्रू जमिनीच्या मार्गाने येतोय राज ठाकरेंनी कुणाला दिला इशारा?

मुंबई– महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या उमेदवारांच्या प्रचारार्थ राज ठाकरेंच्या ठिकठिकाणी सभा होत असून, शुक्रवारी सकाळी गुहागर येथे सभा पार पडली. या सभेत बोलताना राज ठाकरेंनी बाहेरच्या लोकांकडून जमिनी खरेदी केल्या जात असल्याचा आणि कोकणच्या पर्यटनाच्या मुद्द्यावर जोर दिला.

राज ठाकरे म्हणाले, एकदा माझ्या हाती सत्ता देऊन बघा मग बघा कसा कोकण गोवा, केरळपेक्षा मोठा श्रीमंत होईल. फक्त तुम्हाला माणसं बदलावी लागतील; आम्ही सत्तेत नसताना इतकी कामं केली. जर आम्ही सत्तेत आलो तर आम्ही काय करू? मी सत्तेसाठी मागत नाहीये, खुर्चीसाठी नाही मागत आहे. माझी इच्छा आहे की



मला जगाला हेवा वाटेल असा महाराष्ट्र घडवायचा आहे आणि त्यासाठी लागणारी इच्छाशक्ती माझ्याकडे आहे, अशी साद त्यांनी कोकणातील मतदारांना घातली.

मुंबईतल्या वरळीत १६७५ ला छत्रपती शिवाजी महाराजांनी किल्ला बांधला, तो किल्ला महाराजांनी समुद्रातून येणाऱ्या शत्रूंवर लक्ष ठेवण्यासाठी बांधला होता. पण तुमचा शत्रू जमिनीच्या मार्गाने येतोय, तो तुमची जमीन हडपतोय, असा इशारा राज ठाकरेंनी कोकणवासियांना दिला.

नाणार प्रकल्पाच्या निमित्ताने जमिनी हडप केल्या मग नाणारला विरोध झाला मग बारसूला ठरलं प्रकल्प करायचा मग तिथे जमीन अधिग्रहण झालं.

या जमिनी आल्या कुठून ? तुमच्याच जमिनी आहेत या.. मामुली किंमतीत तुमच्याकडून जमीन घ्यायची आणि वाट्टेल तशा किंमतीत सरकारकडून पैसे घेतले जातात. हे सगळं तुमच्या डोळ्यादेखत घडतंय आणि तरीही तुम्हाला याचं वाईट वाटत नाही. तुमच्या पायाखालची जमीन गेली की तुमचं अस्तित्व संपलं. जगात युद्ध झाली ती जमिनीच्या मालकीसाठी हे विसरू नका, असे राज ठाकरे म्हणाले.

## एसटी कर्मचाऱ्यांना आता दिवाळीनंतर भेट

मुंबई : एसटी महामंडळाच्या कर्मचा–यांना यंदा दिवाळी भेट आणि अग्रिम रक्कम मिळणार नसल्याचे वृत्त समोर आले होते. त्यामुळे एसटी कर्मचा–यांत नाराजी वाढली होती.

या पार्श्वभूमीवर आज एसटीचे वरिष्ठ अधिकारी आणि महाराष्ट्र स्टेट ट्रान्सपोर्ट कामगार संघटनेची बैठक झाली. या बैठकीत निवडणूक आयोगाने मंजुरी दिल्यास दिवाळी भेट देण्याचे महामंडळाने मान्य केले. त्यामुळे एसटी कर्मचा–यांच्या आशा पल्लवीत झाल्या आहेत.

मुंबईत झालेल्या बैठकीला एसटी महामंडळाचे उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ. माधव कुसेकर, महामंडळाचे वित्तीय सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी गिरीश देशमुख आणि




इतरही काही अधिकारी उपस्थित होते तर मान्यताप्राप्त संघटनेकडून राज्य अध्यक्ष संदीप शिंदे व इतर पदाधिकारी उपस्थित होते. या बैठकीत संघटनेकडून दिवाळी भेट व उचलबाबत आक्रमक भूमिका घेतली.दिवाळी भेटीची मागणी आचारसंहितेपूर्वीची असून त्याला बोर्डाच्या बैठकीतही आधीच मंजुरी मिळाली. त्यामुळे दिवाळी भेट आणि उचल आचारसंहितेशी जोडणे चुकीचे आहे, अशा शब्दांत संघटनेच्या वतीने नाराजी व्यक्त करण्यात आली.

## संविधानाला रंगामध्ये अडकवण्याचा फडणवीसांचा प्रयत्न –काँग्रेसचे ज्येष्ठ नेते, माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण

सातारा : संविधान हे पवित्र असून ते आपल्या प्रजासत्ताकाचा पायाभूत कायदा आहे. त्याला रंगामध्ये अडकवण्याचा केविलवाणा प्रयत्न देवेंद्र फडणवीस करत असल्याचा जोरदार पलटवार काँग्रेसचे ज्येष्ठ नेते, माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांनी केला आहे.

नागपुरातील संविधान सन्मान संमेलनात राहुल गांधींनी लाल रंगातील पॉकेट संविधानाची प्रत दाखवली होती. त्यावर देवेंद्र फडणवीसांनी केलेल्या टीकेला पृथ्वीराज चव्हाणांनी 'एक्स'वर पोस्ट करत प्रत्युत्तर दिले आहे. भारताच्या प्रत्येक नागरिकाकडे संविधान असले पाहिजे.

या उद्देशाने राहुल गांधी संविधानाबद्दल प्रभावी जनजागृती करत आहेत. स्वत: पंतप्रधान मोदींनी



तत्कालीन राष्ट्रपती रामनाथ कोविंद यांना पॉकेट संविधानाची प्रत भेट दिली होती, हे फडणवीसांना माहीत आहे का?, असा सवालही त्यांनी केला आहे.

**संविधानावर भाजपा, आरएसएसचा लपून हल्ला**

संविधान फक्त पुस्तक नाही, तर जगण्याचा अधिकार आहे. संविधान सर्वांना अधिकार देते. संविधानात सर्व जाती, धर्माचा, प्रदेशाचा आदर आहे. याच संविधानावर भाजपा आणि आरएसएस सातत्याने हल्ले करत आहेत. आरएसएस संविधानावर थेट हल्ला करू शकत नाही, ते लपून हल्ला करतात, असा घणाघाती आरोप राहुल गांधींनी संविधान सन्मान संमेलनात केला होता.

**काय म्हणाले होते फडणवीस?**

लाल पुस्तक हातात घेऊन राहुल गांधी संविधानाचा गौरव करू इच्छित नाहीत तर त्यांच्यासोबत असलेल्या अर्बन नक्षलसोबत फुटीरतावाद्यांची मदत घेण्याकरता ते नौटंकी करत आहेत. संविधानाचा रोज ते अवमान करत आहेत. आजपर्यंत काँग्रेसने डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा आणि संविधानाचा अवमानच केलाय, अशी टीका देवेंद्र फडणवीस यांनी केली होती

## छठपुजेला गेलेले ६ जण बुडाले

रोहतास : बिहारच्या रोहतास जिल्ह्यात छठ पूजेच्या निमित्ताने तिलोथू सोन नदी आणि भानस पोलिस ठाण्याच्या हद्दीतील कालव्यात आंघोळीसाठी गेलेल्या ६ जण डुबल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. यामधील ४ जणांचा मृत्यू झाला आहे. पहिल्या घटनेत तिलौथूमध्ये अंघोळीसाठी गेलेले ४ जण सोन नदीत बुडाले.

पिंटू यादव (३५), धर्मेद्र यादव (४०), बबलू कुमार (१२), आणि विकास यादव (२५, सर्व रहिवासी पथरा) अशी त्यांची नावे आहेत. घटनेनंतर स्थानिकांनी आणि स्वयंसेवकांनी विकास यादवला वाचवले आणि पीएचसीमध्ये पाठवले. यानंतर पुढील उपचारासाठी सासाराम येथील सदर रुग्णालयात पाठवण्यात आले. त्याची प्रकृती स्थिर असल्याचे सांगण्यात येत आहे.

तर पिंटू यादव यालाही बाहेर काढण्यात आले. मात्र, प्राथमिक आरोग्य केंद्रातील डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केले. धर्मेंद्र यादव यांचाही मृतदेह ताब्यात घेण्यात आला आहे. तर बबलू कुमारचा शोध घेतला जात आहे. या घटनेमुळे वीरेंद्र यादव यांनी आपली दोन मुले आणि एक नातूला गमावल्याने कुटुंबावर शोककळा पसरली आहे.

## माफी मागा, अन्यथा..., डी के शिवकुमार यांचा महायुतीच्या नेत्यांना इशारा

नवी दिल्ली– कर्नाटकातील गृहलक्ष्मी योजनेचा उल्लेख करत भाजपने कर्नाटक काँग्रेसवर महिलांचा अपमान केल्याचा आरोप केला. महायुतीच्या आरोपांवर कर्नाटकचे उपमुख्यमंत्री डी.के. शिवकुमार यांनी संताप व्यक्त केला.



कर्नाटकमध्ये गृहलक्ष्मी योजनेअंतर्गत महिलांना दरमहा २००० रुपये देणार अशी घोषणा काँग्रेसने केली होती. पण, कर्नाटकमध्ये महिलांना फसवून त्यांचा अपमान केला, असा आरोप भाजपने केला. भाजपने केलेल्या या आरोपावरून कर्नाटकचे उपमुख्यमंत्री आणि काँग्रेसचे नेते डी के शिवकुमार यांनी संताप व्यक्त केला. महायुतीच्या नेत्यांनी माफी मागावी अन्यथा कायदेशीर कारवाई करू, असा इशाराही त्यांनी दिला.

खटाखट खोटं आश्वासन देणाऱ्यांपासून सावधान. महिलांच्या हक्कांवर दरोडा, काँग्रेसचा हाच खरा चेहरा अशी जाहिरात भाजपकडून करण्यात आली. भाजपकडून करण्यात आलेल्या आरोपांना आता शिवकुमार यांनी प्रत्युत्तर दिलं आहे.

डीके शिवकुमार यांनी म्हटलं आहे की, कर्नाटक हे संपूर्ण देशासाठी एक आदर्श राज्य आहे, कारण इथे केंद्र सरकारच्या महागाईमुळे त्रासलेल्या जनतेला दिलासा देण्यासाठी आम्ही खात्रीशीर योजना राबवल्या आहेत. महाराष्ट्रातील भाजप आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी त्यांच्या जनतेची फसवणूक करत, आमच्या हमी असलेल्या योजनांची नक्कल करण्यापर्यंत ते गेले आहेत.

ही बसवण्णांची भूमी आहे. आम्ही आमच्या जनतेला दिलेले वचन पाळले आहे. याबाबत कोणालाही शंका असेल, तर मी भाजप, शिवसेना आणि राष्ट्रवादीच्या नेत्यांसाठी विशेष विमान किंवा बसेसची व्यवस्था करीन, जेणेकरून ते कर्नाटकात येऊन आमच्या लोकांशी संवाद साधू शकतील आणि सत्य जाणून घेऊ शकतील, असे शिवकुमार यांनी म्हटले आहे.

आमच्या १.२२ कोटी महिलांना 'गृहलक्ष्मी' योजनेतून दरमहा २००० रुपये मिळत आहेत. १.६४ कोटी कुटुंब 'गृहज्योती' योजनेचा लाभ घेत आहेत. ४.०८ कोटी लोकांना 'अन्नभाग्य' योजनेअंतर्गत मोफत तांदूळ दिले जात आहे. 'शक्ती' योजनेद्वारे ३२० कोटी महिलांनी मोफत प्रवास केला आहे. 'युवा निधी' योजनेद्वारे ५ लाख विद्यार्थ्यांना महिन्याला ३००० रुपये मिळत आहेत, असे उत्तर त्यांनी भाजपच्या आरोपांना दिलं आहे.

## महायुतीचा मुख्यमंत्री कोण?, अमित शाहांनी दिले संकेत; एका विधानानं चर्चांना उधाण

सांगली – २० तारखेला महाराष्ट्रात मतदान होणार आहे, त्यात तुम्हाला निर्णायक भूमिका घ्यावी लागेल. मी दीड महिन्यापूर्वी महाराष्ट्राचा दौरा केला. जिथं जिथं मी गेलो, मग विदर्भ, मुंबई, कोकण, कोल्हापूर, जळगाव उत्तर महाराष्ट्रात गेलो तिथे तिथे महायुती सरकार बनवायचं आहे आणि देवेंद्र फडणवीसांना विजयी करायचं आहे असं विधान भाजपा नेते अमित शाह यांनी केले आहे.



सांगलीतल्या शिराळा येथील सभेत ते बोलत होते. अमित शाह यांनी फडणवीसांना विजयी करायचं आहे या विधानानं राजकीय वर्तुळात अनेक तर्कवितर्क लढवले जात आहेत. त्यात देवेंद्र फडणवीसांचे नाव घेऊन पुढील मुख्यमंत्रिपदाचे संकेत शाहांनी दिले असंही बोललं जात आहे. त्याशिवाय महाविकास आघाडीवरही शाहांनी निशाणा साधला. जर चुकून महाविकास आघाडीचं सरकार आले तर उद्धव ठाकरे त्यांच्या मुलाला मुख्यमंत्री बनवू इच्छितात, शरद पवारांना त्यांच्या मुलीला मुख्यमंत्री बनवायचं आहे. काँग्रेस पक्षात १ डझन नेते मुख्यमंत्रिपदासाठी कपडे शिवून बसलेत असा टोला त्यांनी लगावला.

## संपादकीय

# अनर्थामागील अर्थ!

अमेरिकेच्या अध्यक्षीय निवडणुकीतील डोनाल्ड ट्रम्प यांच्या विजयाचे आणि त्यापेक्षाही अधिक कमला हॅरिस यांच्या पराजयाचे कवित्व आणखी बराच काळ राहील. या निकालाचे वेगवेगळे अन्वयार्थ काढले जात असून तेही आणखी काही काळ सुरू राहील. तसे होणे नैसर्गिक. ट्रम्प यांच्यासारखी अ-लोकशाहीवादी, बेमुर्वतखोर आणि सर्व व्यवस्थांना खुंटीवर टांगणारी व्यक्ती जेव्हा प्रामाणिक लोकशाहीवादी, मुर्वतखोर आणि व्यवस्थांचा आदर करणाऱ्या देशात सर्वोच्च सत्तापदी निवडून येते तेव्हा सर्वांचे सैरभैर होणे नैसर्गिक ठरते. त्यातही पराभव झाला म्हणून समर्थकांस चेतवून कॅपिटॉल हिलवर हल्ला करण्यापर्यंत ज्याची मजल गेली आणि माध्यमांतील खोटेपणासाठी ज्यास दंड झाला असा इसम परत अध्यक्षपदी निवडून द्यावा असे अमेरिकी जनतेस वाटलेच कसे, या प्रश्नाचा भुंगा अनेकांच्या डोक्यात प्रदीर्घ काळ घोंघावत राहणे हेही नैसर्गिक. अशा अवस्थेत आपणास हव्या त्या उमेदवाराच्या पराजयाची आणि नको वाटत होता त्या उमेदवाराच्या विजयाची कारणे समोर मांडली जाणेही साहजिक. तरीही लोकशाही प्रक्रियेचा आदर करून ट्रम्प यांचा विजय सर्वांस गोड मानून घ्यावा लागेल. अशा वेळी 'हे' निवडून का आले यापेक्षा 'यांना' निवडून द्यावे असे जनतेस का वाटले नाही, या प्रश्नास भिडणे अधिक प्रामाणिकपणाचे ठरेल. कमला हॅरिस यांस जगातील अनेक सहिष्णू, उदारमतवादी अशा बुद्धिमंतांचा पाठिंबा होता. अनेक नामांकित, अभ्यासू माध्यमकर्मी, समूहांनी आपला कौल कमलाबाईंच्या बाजूने दिला होता. तरीही त्या हरल्या. तेव्हा या सगळ्याची कारणमीमांसा होणार आणि तशी ती व्हायलाही हवी. यातूनच इतरांस काही बोध मिळू शकतो. अर्थात तो घ्यावयाचा असेल तर. तेव्हा यातील पहिला मुद्दा म्हणजे कमला हॅरिस या हरल्याच कशा?

हा प्रश्न ''अयोध्येत भाजपचा पराभव झालाच कसा'', या प्रश्नाशी समांतर जातो आणि त्याचे उत्तरही त्या प्रश्नाच्या उत्तराशी समांतर आहे. कमला हॅरिस यांच्या पक्षाचे माजी राष्ट्राध्यक्ष बिल क्लिंटन यांच्या वचनाचा आधार घ्यावयाचा झाल्यास या प्रश्नाचे उत्तर 'इट्स इकॉनॉमी, स्टुपिड' असे एका वाक्यात देता येईल. अर्थव्यवस्थेतील नाराजी ही राजकीय प्रक्रियेतून व्यक्त होते असा त्याचा अर्थ. यानंतर प्रश्न असा की जगातील सर्वात धनाढ्य देशातील नागरिकांस मुळात आर्थिक विवंचना भेडसावतात कशा आणि कोणत्या? अमेरिकेत सुदैवाने बेरोजगारीची समस्या नाही. तथापि चलनवाढीचे आव्हान मात्र तीव्र आहे. म्हणजे भाववाढ. हाती येणारे उत्पन्न तितकेच किंवा अत्यल्प वाढणार आणि त्याच वेळी याच उत्पन्नात भागवावयाचा खर्च मात्र वाढत जाणार असे हे वास्तव. वेतन स्तब्धता आणि त्याच वेळी खर्च मात्र वाढते ही परिस्थिती. उच्चवर्गीय, उच्चवर्णीय अभिजनवर्गास हे प्रश्न भेडसावत नाहीत. या प्रश्नाचा दाह ज्यांस हातातोंडाची गाठ घालणे जड जाते त्यांस अधिक कळतो. हा वर्ग मोठ्या प्रमाणावर कमलाबाईंच्या विरोधात गेला त्याचे हे कारण. अयोध्येत भव्य राम मंदिर आणि त्याभोवतीच्या परिसरासाठी अनेकांच्या पोटावर पाय आला, त्यांना विस्थापित व्हावे लागले आणि त्यांची ही वेदना मतपेट्यांतून व्यक्त झाल्यावरच इतरांस कळली. तसेच हे. अमेरिकेत माजी अध्यक्ष जॉर्ज बुश यांच्या काळात मध्यवर्ती बँकेचे गव्हर्नर ॲलन ग्रीनस्पॅन यांनी बाजारात मोठ्या प्रमाणावर पैसा ओतला. त्याचा इतका सुळसुळाट झाला की गरजशून्यांनाही कर्जे दिली गेली. त्यातून २००८ चे जागतिक आर्थिक संकट उद्भवले. बँकांचा लंबक दुसऱ्या दिशेला गेला. त्यातून आलेल्या नियमनातून अमेरिकी मध्यमवर्गाच्या पोटास चिमटा बसू लागला. हा वर्ग सत्ताधाऱ्यांवर नाराज होता. निवडणुकीत या वर्गास देण्यासाठी कमला हॅरिस यांच्याकडे काय होते?

गर्भपात हक्क, समलैंगिकांस समान संधी आणि स्थलांतरितांस औदार्य इत्यादी. हे तीनही विषय अभिजनवादी वाटू शकतात हे नाकारणे अप्रामाणिकपणाचे ठरेल. यातील गर्भपाताचा हक्क आणि समलैंगिकांप्रति समानता हे वैयक्तिक जीवनशैलीसंबंधित मुद्दे आहेत. वैयक्तिकांना भेडसावणाऱ्या प्रश्नांची बरोबरी व्यापक समुदायासमोरील आव्हानाशी करणे अयोग्य. आपल्याकडेही हा प्रयत्न होतो. विशेषत: समलैंगिकांबाबत अधिक. गर्भपात करावयाचा की गर्भ वाढू द्यावयाचा हा सर्वस्वी संबंधित स्त्रीचा अधिकार. ज्यांना काहीही सहन करावे लागत नाही त्यांनी मातृत्वाच्या कथित उदात्ततेविषयी कढ खुशाल काढावेत. याबाबत दुमत नाही. पण अमेरिकेत अतिरेक झाला तो दुसऱ्या विषयाचा. भिन्नलिंगी, समलिंगी व्यक्तींस अन्यांइतकाच जगण्याचा अधिकार आहे आणि सर्वांस मिळणाऱ्या सेवांवर त्यांचाही तितकाच हक्क आहे, हे मान्य. त्यांना तो अधिकार मिळायलाच हवा आणि त्यासाठी अन्यांनी प्रयत्न करायला हवेत हेही मान्य. परंतु त्यांच्या या हक्कांचे पुरस्कर्ते त्याबाबत प्रचाराचा इतका अतिरेक करतात की भिन्नलिंगी लोकांस आपण समलिंगी नाही याबाबत गंड निर्माण व्हावा! पुरोगामित्वाचा अस्थानी अतिरेक हा प्रतिगामींस अधिक बळ देणारा असतो याचे मोठे उदाहरण भारताइतके अन्यत्र कोठेही नव्हते. या निवडणुकीने अमेरिकेस ते मिळाले. पुरोगामित्वाचा पुरस्कार करण्याआधी काहीएक किमान गरजा भागवण्याची हमी हवी. ती देण्यात हॅरिस नि:संशय कमी पडल्या. त्यामुळे हॅरिस यांचे पुरोगामित्व हेच सर्व समस्यांचे मूळ आहे हे ट्रम्प यांचे अतिरेकी कथानक अमेरिकी जनतेने सहज स्वीकारले. हॅरिस यांच्यावर ट्रम्प यांनी 'अर्बन नक्षल' असल्याचा आरोप केला नाही, इतकेच. बाकी सारे तेच आणि तसेच.तीच बाब स्थलांतरितांविषयी. आज जगातील बहुसंख्य देशांस बेकायदा स्थलांतरितांची समस्या भेडसावत आहे. ती खरी नाही, असे म्हणणे हा आणखी एक अप्रामाणिकपणा. आपापल्या देशांत कमालीची हलाखी सहन करणारे हजारो अभागी जगण्यासाठी मायदेशाचा त्याग करतात आणि मिळेल तेथे आसरा घेऊ पाहतात.

# आचारसंहितेचे उल्लंघन होतेय ? मग, सी व्हिजिल ॲपवर तक्रार करा !-जिल्हाधिकारी डॉ. मित्ताली सेठी यांचे आवाहन



**नंदुरबार - विधानसभा निवडणूक २०२४ च्या आचारसंहिता कालावधीत आचारसंहितेचे उल्लंघन होत असल्यास सर्वसामान्य मतदार, नागरिकांना आता थेट निवडणूक आयोगाकडे तक्रार करता येणार आहे. त्यासाठी भारत निवडणूक आयोगाने 'सी व्हिजिल सिटीझन अप' विकसित केले आहे. या ॲपवर दाखल होणाऱ्या तक्रारींवर १०० मिनिटांत पहिली कार्यवाही केली जात आहे. त्यामुळे आचारसंहितेचा भंग होत आहे, असे वाटत असल्यास नागरिकांनी थेट सी व्हिजिल ॲपवर तक्रार दाखल करावी, असे आवाहन जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी डॉ. मित्ताली सेठी यांनी केले आहे.**

आचारसंहिता कालावधीत काय करावे आणि काय करु नये याविषयी निवडणूक उमेदवार, प्रशासन आणि राजकीय पक्षाना माहिती दिली जाते. पण, काहीवेळा आदर्श आचारसंहितेचे उल्लंघन होते. त्याची तक्रार करणे आता पूर्वपिक्षा अधिक सुलभ झाले आहे. आचारसंहिता उल्लंघनाची तक्रार किंवा माहिती निवडणूक आयोग आणि जिल्हा प्रशासनापर्यंत पोहोचवण्यासाठी भारत निवडणूक आयोगाने सी व्हिजिल ॲप विकसित केले आहे. या मोबाईल ॲपद्वारे मतदारांना आता थेट आयोगाकडे तक्रार करता येणार आहे. या सी व्हिजिल ॲपवर तक्रार प्राप्त होताच तातडीने त्यावर कारवाई केली जाते. तक्रारदाराचे नाव गोपनीय ठेवले जाते. सी व्हिजिल ॲप अँड्रॉइड आणि आयओएस डिव्हाइसवर डाऊनलोड करण्यासाठी उपलब्ध आहे. उल्लंघनाची तक्रार करण्यासाठी, वापरकर्त्यांनी फक्त ॲप उघडणे, उल्लंघनाचा प्रकार निवडणे आणि घटनेचे तपशिल, स्थान, करणे आवश्यक आहे. ॲप वापरकत्यांना त्यांच्या तक्रारींच्या प्रगतीचा मागोवा घेता येणार आहे. वैशिष्ट्ये सी व्हिजिल ॲप हा वापरकर्त्यांना आदर्श आचारसंहितेच्या उल्लंघनाची तक्रार करण्याची अनुमती देतो, नागरिकांना निवडणूक प्रक्रियेत सहभागी होण्यासाठी व्यासपीठ उपलब्ध करून देतो. उल्लंघनाचे स्थान ट्रॅक करण्यासाठी जीपीएस वापरतो. वापरकर्त्यांना केवळ थेट घटना चित्रित करण्याची अनुमती देतो. तक्रारीच्या प्रगतीचा मागोवा घेतो.

**वापर कसा करायचा...**

एन्ड्रॉईड मोबाईलमधील गुगल प्ले स्टोर वेळ आणि छायाचित्रे किंवा व्हीडिओ प्रदान आणि आयफोनमधील ॲप स्टोर या ॲपमध्ये जावून सी व्हिजिल सर्च करावे. त्यानंतर ॲप डाऊनलोड करा, त्यानंतर ॲप उघडून मोबाईल क्रमांक, पत्ता, मतदारसंघ समाविष्ट करुन खाते तयार करा. तुम्हाला ज्या उल्लंघनाची तक्रार करायची आहे ते निवडा आणि स्थळ, वेळ आणि छायाचित्रे किंवा व्हिडिओसह घटनेचे तपशील टाका. त्यानंतर तक्रार सबमिट करा. अचूक कृती व देखरेख या ॲप्लिकेशनचा वापर करून, निवडणूक निर्णय अधिकारी कार्यालयात न जाताही काही मिनिटांतच नागरिक राजकीय गैरव्यवहाराच्या घटनांची तक्रार नोंदवू शकतात. हा सी व्हिजिल ॲप जिल्हा नियंत्रण कक्ष, निवडणूक निर्णय अधिकारी आणि भरारी पथकाशी जागरूक नागरिकांना जोडतो. ज्यामुळे एक जलद आणि अचूक कृती, देखरेख आणि अहवाल प्रणाली तयार होते. लाईव्ह फोटो, व्हिडिओ ॲपच्या अचूकतेसाठी ॲपमधून फक्त लाईव्ह लोकेशनवर आधारित फोट व्हीडिओ घेतले जातात. जेणेकरुन भरारी पथक, स्थिर संनिरीक्षण चमुंना वेळेत कार्यवाही करणे शक्य होईल, असेही डॉ. सेठी यांनी नमूद केले आहे.

**तातडीने होते कारवाई...**

या ॲपवर तक्रार दाखल होताच निवडणूक यंत्रणा तुमच्या तक्रारीची चौकशी करेल आणि योग्य ती कारवाई करेल. डाटा सुरक्षा या ॲपवरील डाटा हा सुरक्षित ठेवला जातो. हा डाटा इतर कोणत्याही थर्ड पार्टीला दिला जात नाही.

याशिवाय हा डाटा एन्ड टू एन्ड इन्क्रिप्टेड ठेवला जातो. तरी नागरिकांनी आचारसंहिता भंगाच्या तक्रारी सी-व्हीजील ॲपवर नोंदवाव्यात तसेच १९५० टोल फ्री क्रमांकावर ही तक्रार नोंदविता येईल, असेही जिल्हाधिकारी डॉ. मित्ताली सेठी यांनी कळविले आहे.

# कपाशीचे पीक हिरवें गार त्यावर पडला बोंड अळीचा मार...!



चोपडा ( प्रतिनिधी) तालुक्यात कापसाचे पीक दिवसेंदिवस हिरवे दिसत असून, त्यावर आता पूर्णपणे बोंड अळीने आक्रमण केले आहे. परिणामी काही शेतकऱ्यांनी कपाशी उपटून काढण्याचे काम सुरू केले आहे. चोपडा तालुक्यात आडगाव, वरळी लासुर, विरवाडे, तसेच पश्चिम भागात मोठ्या प्रमाणावर कापूस पिकावर गुलाबी बोंड आळी आणि आक्रमण केले आहे. यामुळे कापूस स रकी खराब कीडकी झाली आहे. या कापसाला भाव नसल्याने शेतकऱ्याची दुहेरी चिंता वाढली आहे. कापसाचे भाव देखील वाढ न झाल्याने व उत्पन्नात फरक पडल्याने शेतकरी चिंताग्रस्त झाले आहेत.

शासनाने बोंड आळी ग्रस्त भागात पंचनामे करावेत अशी मागणी शेतकरी वर्गाकडून होत आहे.

# धुळ्यात बाल शिक्षण परिषदेचे राज्यस्तरीय अधिवेशन

धुळे : महाराष्ट्र बाल शिक्षण परिषदेचे राज्यव्यापी ३१ वे अधिवेशन शुक्रवारपासून तीन दिवस शहरातील स्त्री शिक्षण संस्थेच्या कमलाबाई कन्या शाळेत होत आहे. धुळे शहरात दुसऱ्यांदा हे अधिवेशन होत असून याआधी २०११ मध्ये अधिवेशन शहरात झाले होते. बाल शिक्षणाची नवी दिशा आणि त्यातील सामाजिक आर्थिक जाणीवा हा या अधिवेशनाचा विषय राहणार असून यात विविध विषयांवर तज्ञ व्याख्याते मार्गदर्शन करणार आहेत. अधिवेशनाचे जिल्हा परिषदेचे उद्घाटन जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विशाल नरवाडे यांच्या हस्ते सकाळी दहाला उद्घाटन होईल. यावेळी परिषदेचे राज्य अध्यक्ष डी. एम. कस्तुरे अध्यक्षस्थानी असतील तर शिक्षणाधिकारी (प्राथमिक) डॉ. किरण कुवर प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित राहतील, शनिवारी (ता. ८) रोजी तिसऱ्या सत्रात राज्य आराखडा स्वरूप' या विषयावर डॉ. वृषाली देहाडराय, 'अंकुरती साक्षरता संकल्पना आणि व्यवहार या विषयावर डॉ. शैलाजा मेनन व निलेश निमकर यांचे तर बालशिक्षण आणि सामाजिक भावनिक बुद्धिमत्ता या विषयावर रेणू दांडेकर यांचे व्याख्यान होतील. 'बालकेंद्रीय घर आणि पालकांची भूमिका या विषयावर परिसंवाद देखील होणार असून यात डॉ. दिनेश नेहते, डॉ. शुभांगी मुंधडा, मुक्ता पुराणिक, डॉ. केतकी बंकापुरे, डॉ. किर्ती पटवर्धन हे सहभाग घेतील. चौथ्या सत्रात कार्यशाळा, पोस्टर प्रेसेंटेशन, तसेच शैक्षणिक साहित्य प्रदर्शन भरविण्यात येणार आहे. शहरातील प्राथमिक शिक्षकांनी बालशिक्षणासाठी निर्माण केलेले साहित्याचे प्रदर्शन असणार आहे.

# धुळे ग्रामीण विधानसभा मतदार संघात १० नोव्हेंबरला होणार गृहमतदान

धुळे- विधानसभा निवडणुकीत जास्तीत जास्त मतदान व्हावे, यासाठी जिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी जितेंद्र पापळकर यांच्या मार्गदर्शनाखाली शासकीय यंत्रणेने नियोजन केले आहे. भारत निवडणूक आयोगाने ८५ वर्षापुढील, अंथरुणाला खिळलेले व दिव्यांग मतदार जे मतदान केंद्रापर्यंत जाऊ शकणार नाहीत, त्यांच्यासाठी गृह मतदानाची सुविधा उपलब्ध करुन दिली आहे. त्यानुसार धुळे ग्रामीण विधानसभा मतदार संघात ११६ मतदारांनी निवडणूक यंत्रणेकडे अर्ज भरून दिले आहे. या मतदारांसाठी १० नोव्हेंबरला संबंधितांच्या घरी जावून मतदान घेण्यात येणार आहे, अशी माहिती धुळे ग्रामीण विधानसभा मतदार संघाचे निवडणूक निर्णय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी रोहन कुवर यांनी दिली आहे. याकरीता धुळे ग्रामीण भारत निर्वाचन आयोग विधानसभा मतदार संघातील ८५ वर्षांपेक्षा जास्त वयाचे, दिव्यांग मतदारांची आपआपल्या कार्यक्षेत्रातील बीएलओंनी नोंद करून अर्ज भरून घेतले आहेत. यापैकी मतदान केंद्रात जावून मतदान करणे शक्य नसलेल्या मतदारांची संख्या ११६ एवढी आहे. यात ८५ वर्षावरील ९९ मतदार असून १७ दिव्यांग मतदारांचा समावेश आहे.

या सर्व वृद्ध मतदारांच्या घरी जावून मतदान घेतले जाणार आहे. यासाठी धुळे ग्रामीण विधानसभा मतदार संघात १० नोव्हेंबरला सकाळी ८ ते सायंकाळी ६ वाजेपर्यंत ही प्रक्रिया राबवण्यात येईल. तर या तारखेस अनुपस्थित असलेल्या मतदारांसाठी १५ नोव्हेंबर रोजी मतदान घेतले जाणार आहेत. त्यासाठी ९ पथके तयार करण्यात आली असून यापैकी १ पथक राखीव ठेवण्यात आले आहे. या प्रत्येक पथकामध्ये दोन मतदान अधिकारी, एक पोलीस कर्मचारी, एक स्क्षम निरिक्षक तर एक व्हीडीओग्राफर अशी ५ कर्मचाऱ्यांची टीम असणार आहे.

तरी धुळे ग्रामीण विधानसभा मतदार संघातील ज्या ८५ वर्षावरील व दिव्यांग मतदारांनी गृह मतदानासाठी नोंद केली आहे. त्यांनी याची नोंद घेऊन आपला मतदानाचा हक्क बजवावा. तसेच यादिवशी मतदार अनुपस्थित असल्यास त्यांना मतदानाची संधी नसेल, असेही निवडणूक निर्णय अधिकारी रोहन कुवर यानी कळविले आहे.

# मतदान जनजागृतीसाठी मनपा तर्फे रिल मेकिंग स्पर्धेचे आयोजन

जळगाव-विधानसभा निवडणुकीत मतदानाचा टक्का वाढावा या उद्देशाने जळगाव शहर महानगरपालिका आणि एन व्ही टेक्नॉलॉजी सर्व्हिसेस यांच्या संयुक्त विद्यमाने सोशल मीडिया वर सक्रिय तरुणाई साठी रिल्स मेकिंग स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे.ही स्पर्धा दि. ९ ते १९ नोव्हेंबर दरम्यान आयोजित करण्यात येणार असून या स्पर्धेत सहभागी होण्यासाठी ६० सेकंद लांबीचा शॉर्ट व्हिडिओ तयार करावयाचा असून त्या व्हिडिओ मधून मतदान जनजागृती साठीचा संदेश असणे आवश्यक आहे. ज्या स्पर्धकांकडे रिल तयार करण्यासाठी तांत्रिक गोष्टींची उपलब्धता नाही त्यांच्यासाठी एन व्ही टेक्नॉलॉजी सर्व्हिसेस तर्फे व्हिडिओ निर्मितीसाठी आवश्यक असणाऱ्या प्रोफेशनल साधनांची पूर्तता कोणतेही शुल्क न आकारता करण्यात येणार आहे. या मध्ये + खालील उपकरणे उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. प्रोफेशनल ग्रेड व्हीडिओ, लाईट प्रोफेशनल ग्रेड वायरलेस, वायर माइक ग्रीन स्क्रीन, ट्राय पॉड, आर जी बी लाईट, रिंग लाईट स्पर्धेत सहभागी होण्यासाठी स्पर्धकांनी तयार केलेले रिल आपल्या खात्यावर अपलोड करून जळगाव शहर महानगरपालिकेच्या अधिकृत खात्यांना टॅग करावे. ज्या स्पर्धकांना मोफत तांत्रिक सहाय्य हवे असेल त्यांनी एन व्ही टेक्नॉलॉजी सर्व्हिसेस, विठ्ठल शॉपिंग कॉम्प्लेक्स, दुसरा मजला, ओंकारेश्वर मंदिराजवळ, जळगाव, याठिकाणी भेट द्यावी किंवा संपर्क साधावा.

# निवडणूक कर्तव्यावरील कर्मचाऱ्यांना मतदानासाठी सुलभता केंद्राची स्थापना-जिल्हाधिकारी डॉ.सेठी

नंदुरबार -विधानसभा सार्वत्रिक निवडणुक-२०२४ च्या अनुषंगाने भारत निवडणुक आयोगाने घोषित केला असून, मतदानाच्या दिवशी निवडणूक कर्तव्यावर असलेल्या अधिकारी व कर्मचारी यांना मतदान करण्याकरीता मध्यवर्ती ठिकाण निश्चित करून मतदार सुलभता केंद्राची स्थापना करण्यात आल्याची माहिती जिल्हाधिकारी तथा, जिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी, नंदुरबार डॉ. मित्ताली सेठी यांनी एका शासकीय प्रसिद्धी पत्रकाद्वारे कळविले आहे.

भारत निवडणूक आयोगाने मतदानाच्या दिवशी निवडणूक कर्तव्यावर असलेल्या अधिकारी व कर्मचारी यांना टपाली मतदानाद्वारे मतदान करण्यासाठी मतदार सुलभता केंद्र स्थापन करण्याचे + निर्देश दिले आहेत.

नंदुरबार जिल्ह्यातील अक्कलकुवा, शहादा, नंदुरबार, नवापूर या अशा एकूण ४ विधानसभा मतदार संघाचा समावेश आहे. या विधानसभा मतदार संघातील आवश्यक तसेच निवडणूक सेवेच्या कर्तव्यावर असलेल्या अधिकारी व कर्मचाऱ्यांना मतदानाचा हक्क बजावता यावा यासाठी मतदार सुलभता केंद्र स्थापना करण्यात आली आहे.

अक्कलकूवा तहसिल कार्यालय, मतदार केंद्रावर नियूक्त असलेल्यासाठी सुलभता केंद्राची दिनांक व वेळअक्कलकुवा १२,१३ व १९ नोव्हेंबर २०२४ सकाळी ९ ते मतदान समाप्ती पर्यंत, शहादा कै. डॉ. विश्रामकाका शैक्षणिक संकूल (विकास हायस्कुल), शहादा १२, १३, व १९ नोव्हेंबर २०२४ सकाळी ९ ते मतदान समाप्तीपर्यंत, नंदुरबार हि. ग्रो. श्रॉफ हायस्कुल नंदुरबार, १२, १३, व १९ नोव्हेंबर २०२४ सकाळी ९ ते मतदान समाप्ती पर्यंत, नवापूर नगर परिषद, टॉऊन हॉल नवापूर मतदार केंद्राव्यतिरीक्त निवडणूक कर्तव्यावर असणाऱ्यांसाठी अक्कलकूवा तहसिल कार्यालय, अक्कलकुवा १७,१८,व १९ नोव्हेंबर २०२४सकाळी ९ ते संध्याकाळी ५ वाजेपर्यंत, शहादा तहसिल कार्यालय, शहादा १७, १८, व १९नोव्हेंबर २०२४ सकाळी ९ ते संध्याकाळी ५ नंदुरबार तहसिल कार्यालय, नंदुरबार १७,१८व १९ नोव्हेंबर २०२४, सकाळी ९ ते संध्याकाळी ५ वाजेपर्यंत, नवापूर तहसिल कार्यालय, नवापूर १७,१८ व १९ नोव्हेंबर २०२४ सकाळी ९ ते संध्याकाळी ५ वाजेपर्यंत नमुद दिनांक व वेळेत नियूक्तीसाठी असणारे अधिकारी व कर्मचारी व मतदान केंद्राव्यतिरिक्त असणारे अधिकारी व कर्मचारी सुलभता केंद्रात मतदान करावे, असे आवाहन जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी, (नंदुरबार) डॉ. मित्ताली सेठी यांनी केले आहे.

# निवडणूक आयोगाच्या पत्रकार परिषदेवर मुक्ताईनगरच्या पत्रकारांचा बहिष्काराचा पवित्रा; जिल्हाधिकाऱ्यांची दखल; तत्काळ मुक्ताईनगरला भेट



मुक्ताईनगर - निवडणूक निर्णय अधिकारी यांनी आयोजित केलेल्या पत्रकार परिषदेला मुक्ताईनगरच्या पत्रकारांनी बहिष्कार टाकल्यामुळे पत्रकार परिषद होऊ शकली नाही तसेच पत्रकारांनी निवडणूक आयोग व जिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी यांना तक्रारी पाठवल्यानंतर जिल्हाधिकारी आयुष प्रसाद यांनी तात्काळ मुक्ताईनगर येथील विश्रामगृहावर भेट देत पत्रकारांची बैठक घेतली व तहसीलदार गिरीश वखारे यांना विविध आदेश पत्रकारांसोबत सहकार्य करण्याचे सुचवले.

मुक्ताईनगर चे निवडणूक निर्णय अधिकारी तसेच सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी हे पत्रकारांना सहकार्य करत नाही वेळेवर बातम्या देत नाही रात्री दहा वाजेपर्यंत पत्रकारांना बसवून ठेवतात त्याचबरोबर बाहेर नोटीस लावण्यात येईल त्यानंतरच आपण बातम्या घ्याव्या अशा चुकीच्या पद्धतीने पत्रकारांशी वागणूक देत होते.

विशेष म्हणजे पत्रकारांनी भेट मागितली असता मला वेळ नाही असा निरोप निवडणूक निर्णय अधिकारी यांनी दिला होता यावरून पत्रकारांनी संतप्त होऊन निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांच्या कोणत्याही बातम्या अथवा पत्रकार परिषदेला हजर न राहण्याचे ठरवले होते.

दिनांक ४ रोजी मुक्ताईनगर विधानसभा मतदारसंघाच्या निवडणुकीच्या संदर्भात निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी पत्रकार परिषद आयोजित केलेली होती मात्र एकाही पत्रकाराने या पत्रकार परिषदेला हजर लावली नाही त्यामुळे सदर बाब जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी आयुष प्रसाद यांना कळाली, पत्रकार संघटनेतर्फे निवडणूक आयोग व जिल्हा निवडणूक संदर्भात तक्रार करण्यात आलेली होती. दरम्यान दिनांक ७ रोजी दुपारी एक वाजेच्या सुमारास जिल्हाधिकारी यांनी मुक्ताईनगर गाठाळत पत्रकारांनी बहिष्कार का टाकला या संदर्भात सर्वच पत्रकारांना आमंत्रित करून त्यांची बाजू समजून घेतली याप्रसंगी तहसीलदार तथा सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी यांना पत्रकार कक्ष स्थापन करणे वेळेच्या आत माहिती देणे मतमोजणी केंद्रावर पत्रकार कक्ष ची उभारणी करणे त्या ठिकाणी विविध सोयी सुविधा उपलब्ध करून देतानाच दूरचित्रवाणीची देखील सुविधा करण्यात यावी असे आदेश दिले.

दरम्यान जे पत्रकार शिक्षक आहेत व त्यांना निवडणुकीची कामे दिलेली असतील त्यांची कामे कमी करण्याचे आदेश देखील तहसीलदारांना जिल्हा अधिकाऱ्यांकडे देखील या निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी दिले.

हे वृत्तपत्र मालक ओतारी रेखाबाई काशिनाथ व प्रकाशक सागर काशिनाथ ओतारी यांनी मुद्रक श्री समर्थ कृपा डिजिटल प्रिंटर्स पी-३३, औद्योगिक वसाहत शॉपिंग कॉम्प्लेक्स, जुनी एमआयडीसी, जळगांव-४२५००१ येथे शॉप नं.ई/१२ चौथा मजला गोलाणी मार्केट, ४२५००१ (महाराष्ट्र) येथे प्रसिध्द केले. ◆ **मुख्य संपादक : सागर काशिनाथ ओतारी * संपादक: नंदलाल मराठे** (९१७५९९६२३२) (* पी.आर.बी.कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची राहील.) या अंकात प्रसिध्द झालेल्या बातम्या व लेख या मधून झालेल्या मतांशी संपादक / सहमत असतीलच असे नाही. **Email- dainikshauryamarathi@gmail.com** (RNI-MAHMAR/2023/89125)

# पाचोऱ्यात विशेष रूट मार्चद्वारे घेतला सुरक्षा व्यवस्थेचा आढावा

## विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर पोलीस प्रशासनाची प्रभावी तयारी

पाचोरा : आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर कायदा आणि सुव्यवस्था राखण्यासाठी पोलीस प्रशासनाकडून विशेष रूट मार्चचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी रुटमार्चच्या माध्यमातून पोलिसांनी सुरक्षा व्यवस्थेचा आढावा घेतला.जिल्हा पोलीस अधीक्षक डॉ. एम.सी.व्ही. महेश्वर रेड्डी व उपविभागीय पोलीस अधिकारी धनंजय वेरूळे यांच्या मार्गदर्शनाखाली पाचोरा पोलीस स्टेशनचे प्रमुख पोलीस निरीक्षक अशोक पवार यांच्या नेतृत्वात रूटमार्च काढण्यात आला. आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर निघालेल्या या रूटमार्चमध्ये एपीआय श्री. बदाने, पीएसआय योगेश गंगणे, प्रकाश चकाण, परशुराम दळवी यांच्यासह अधिकारी व कर्मचाऱ्यांचा समावेश होता. यासोबतच एसएसबीचे २ अधिकारी व ३२ कर्मचारी, तसेच पाचोरा पोलीस स्टेशनचे ५ अधिकारी व ३० कर्मचाऱ्यांचीही उपस्थिती होती. हा रूटमार्च सायंकाळी ५ वाजता भारत डेअरी



चौकातून सुरू झाला. ६.१५ वाजता त्याची सांगता झाली. भारत डेअरी चौक, कृष्णापुरी, आठवडे बाजार, हुसेनी चौक, मच्छी बाजार, पंचमुखी हनुमान, बाहेर पुरा, गांधी चौक, सराफ बाजार, मुल्ला वाडा, मानसिंग कॉर्नर आणि छत्रपती शिवाजी महाराज चौक यासारख्या शहरातील विविध भागातून पोलीस पथकाने शांततापूर्ण मार्गक्रमण केले. या रूट मार्चला नागरिकांचा उत्तम प्रतिसाद मिळाला. विविध भागांतून नागरिकांनी पोलीस प्रशासनाचे कौतुक केले. तसेच निवडणुकीच्या काळात शांतता व सुव्यवस्था राखण्यासाठी सहकार्य करण्याची तयारीही दर्शवली. नागरिकांमध्ये पोलीस प्रशासनाच्या सतर्कतेमुळे निवडणुकीच्या काळात सुरक्षिततेची भावना जागृत झाली आहे.

या रूट मार्चदरम्यान पोलीस प्रशासनाने नाकाबंदी लागू केली होती. ज्यामुळे वाहतूक सुरळीत ठेवून गर्दीवर नियंत्रण ठेवण्यात आले. निवडणुकीच्या काळात कोणताही अनुचित प्रकार घडू नये, यासाठी पोलीस सतर्कतेने काम करत आहेत. तर पोलीस प्रशासनाच्या या विशेष रूट मार्चमुळे नागरिकांमध्ये सुरक्षा व विश्वासाची भावना अधिक दृढ झाली आहे.निवडणूक काळात शांतता राखणे, कायद्याचे पालन होण्यासाठी आवश्यक सर्व खबरदारी घेणे, हे पोलीस प्रशासनाचे मुख्य उद्दिष्ट आहे. या रूट मार्चच्या माध्यमातून प्रशासनाने आपली तयारी व सतर्कता दाखवून दिली. निवडणुकीच्या काळात कुठलाही अनुचित प्रकार घडू नये म्हणून पोलीस अधिकारी नागरिकांना नियमांचे पालन करण्याचे आवाहन करत आहेत.

# ज्वेलर्सचे दुकान फोडणारा चोरटा २४ तासात जेरबंद

जळगाव-श्रीरत्न कॉलनीत सुरेंद्रकुमार शंकरलाल जैन यांच्या मालकीचे ज्वेलरी दुकान फोडणाऱ्या समीर शेख इकबाल (वय २४, रा.हुडको, रा. पिंप्राळा) याला रामानंद नगर पोलिसांनी २४ तासाच्या आत अटक केली. त्याचा दुसरा साथीदार पसार असून त्याचा शोध सुरु आहे. शहराहून गेलेल्या महामार्गाच्या पाठीमागे पिंप्राळ्यातील श्रीरत्न कॉलनीत सुरेंद्रकुमार जैन यांच्या मालकीचे

ज्वेलरी दुकान आहे. दि. ४ नोव्हेंबर रोजी सायंकाळी दुकान बंद केल्यानंतर जैन घरी गेले होते. मध्यरात्री दुकाने शटरचे कुलूप तोडल्याचे शेजारी राहणाऱ्यांच्या लक्षात आल्यावर त्यांनी जैन यांना कळवले. त्यांनी लागलीच दुकानात येऊन पाहणी केली असता दुकानातील ८ हजार रुपये किमतीचे चांदीचे १६ जोडवे, ७ हजार २ रुपये किमतीच्या सोन्याच्या १२ फुल्या व ५०० रुपये रोख चोरी झाल्याचे उघड झाले. या घटनेनंतर जैन यांनी रामानंद नगर पोलिस ठाणे गाठून तक्रार केली.गुन्हा दाखल झाल्यावर पोलिसांनी केलेल्या चौकशीत दोन जणांनी ही चोरी केल्याची माहिती मिळाली. त्यानुसार गुरुवारी मध्यरात्री समीर शेख इकबाल याला अटक करण्यात आली. त्याने गुन्ह्याची कबुली दिली आहे. दुसरा सहकारी फरार असून त्याचा शोध सुरु असल्याची माहिती तपासी अमलदार जितेंद्र राजपूत यांनी दिली.

# धुळ्यात ८३ लाखांचे १ किलो सोने हस्तगत; तिघांची चौकशी

धुळे : स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेच्या पथकाने गुप्त माहितीवरुन केलेल्या कारवाईत एका इनोव्हा कारमधून ८३ लाख रुपये किमतीचे १ किलो ८५ ग्रॅम सोने हस्तगत केले आहे. चौकशीसाठी कारमधील तिघांना ताब्यात घेण्यात आले. विधानसभा निवडणुकीच्या अनुषंगाने ही कारवाई करण्यात आली. हस्तगत केलेले सोने कोषागार शाखेत सुरक्षित ठेवण्यात आले असून एफएसटी (फ्लाइंग स्कॉड टीम) कडून तपास करण्यात येत आहे. चौकशीअंती याबाबत अधिक माहिती प्राप्त होवू शकणार आहे. तर ताब्यात घेतलेल्या तिघांना चौकशी करुन सोडून देण्यात आले.

याप्रकरणी रात्री उशिरापर्यंत चाळीसगाव रोड पोलीस ठाण्यात नोंद करण्याचे काम सुरु होते. विधानसभा निवडणुकीच्या अनुषंगाने शहरात येणाऱ्या सर्व मार्गावर तपासणी नाके कार्यान्वित करण्यात आले आहेत. पोलीस

प्रशासनाने तसेच तपासणी नाक्यावरील अधिकारी, कर्मचाऱ्यांनी शिरपूर येथील हाडाखेड तपासणी नाक्यावर ७० लाख रुपयांची रोकड यापूर्वी पकडली आहे. याबाबतची चौकशी सुरु असतांना काल (दि.७) स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेचे पोलीस निरीक्षक श्रीराम पवार यांना गुप्त माहिती मिळाली की, औरंगाबाद येथून धुळ्यात येणारी इनोव्हा (एमएच १८/बीसी ९८९९) या कारमधून सोने आणले जाणार आहे. त्यानुसार निरीक्षक श्री. पवार यांनी गुन्हे शाखेच्या एका पथकाला नाकाबंदी करुन कारवाई करण्याच्या सूचना केल्या. पथकाने चाळीसगाव रोड चौफुली जवळील दादावाडी परिसरात असलेल्या संतोषी माता मंदिराजवळ रोडवर रात्री ११ वाजेपासून सापळा रचला. रात्री १.३० वाजेच्या सुमारास संशयीत इनोव्हा कार धुळे शहरात येतांना दिसून आली.

पथकाने कार चालकास थांबविण्याचा इशारा केला. तेव्हा वाहन चालकाने कार थांबवली. पथकाने कारमध्ये बसलेल्या तिघांची चौकशी केली. तेव्हा त्यांच्या हालचाली संशयास्पद वाटल्याने पथकाने कारची तपासणी केली. त्यात ८३ लाख रुपये किमतीचे १ किलो ८५ ग्रॅम सोने आढळून आले. ही माहिती विधानसभा निवडणुकीच्या फ्लाइंग स्कॉड टीम (एफएसटी) ला कळविण्यात आली. हे पथक लागलीच घटनास्थळी दाखल झाले. पथकाने सोने, कार व तिघांना ताब्यात घेवून गुन्हे शाखेच्या कार्यालयात आणले. या ठिकाणी चौकशी केल्यानंतर तिघांना सोडून देण्यात आले. यांप्रकरणी चाळीसगाव रोड पोलीस ठाण्यात उशिरापर्यंत नोंद करण्याचे काम सुरु होते. दरम्यान, हस्तगत केलेले सोने कोषागार शाखेच्या तिजोरीत सुरक्षित ठेवण्यात आले आहे. याबाबतचा तपास एफएसटीचे पथक करीत आहे.

# फेकरी, झेटीएस अंडरपासमध्ये साचले पाणी

भुसावळ : फेकरी व झेडटीसी रेल्वे अंडरपासमध्ये पाणी साचल्याने वाहतूक विस्कळीत होते. यामुळे नागरिकांना उड्डाणपूल किंवा झेडटीसी मार्गावरुन वापर करावा लागतो. त्याचप्रमाणे या रस्त्यात खड्डे पडल्याने वाहनधारांना खड्डयांचा अदांज येत नसल्याने छोटे-मोठे अपघात घडत आहेत. मात्र, याकडे रेलवे प्रशासनाचे दुर्लक्ष होत आहे. झेडटीसी अंडपासमध्ये साचलेले पाणी बाहेर काढले जाते. परंतु, तेच पाणी पुन्हा अंडरपासमध्ये येते. त्यामुळे नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. तर फेकरी येथील रेल्वे अंडरपासमध्ये पाणी साचल्याने वाहतूक विस्कळीत होते. यामुळे नागरिकांना उड्डाणपूल किंवा झेडटीसी मार्गावरुन वापर करावा लागत आहे. रेल्वे प्रशासनाने



तेथे पंप बसवून अंडरपासमध्ये तुंबलेल्या पाण्याचा उपसा करावा, अशी मागणी वाहन चालक करत आहेत. दरम्यान, झेडटीसी मार्गावरील बोगद्यात पाणी साचले आहे. या ठिकाणी संबंधित ठेकेदाराने पंपिंगची व्यवस्था केली आहे. मात्र, ती कायमस्वरुपी नाही.

पाऊस झाल्यानंतर १ ते २ दिवसांनी पंप आणून हे पाणी उपसले जाते. यामुळे या ठिकाणी वाहनधारकांना त्रास सहन करावा लागतो. कायमस्वरुपी उपाययोजना होण्यासाठी तातडीने डोमचे काम पूर्ण करणे आवश्यक आहे. हे काम पूर्ण होत नाही, तोपर्यंत किमान कायमस्वरुपी पंप ठेवावा. यामुळे अंडरपासमध्ये पाणी साचले की, तातडीने पाणी उपसा केल्यास वाहनधारकांना दिलासा मिळेल. तर झेडटीएस बोगद्यात साचणारे पाणी बाहेर काढले जाते. परंतु, पुन्हा तेच पाणी बोगद्यात साचते. यामुळे वाहनधारकांना त्रास सहन करावा लागतो. त्याचप्रमाणे बोगद्यात मोठ-मोठे खड्डे पडले असून त्यामध्ये पाणी साचल्याने वाहनधारकांना खड्डयांचा अंदाज येत नसल्याने बऱ्याच वेळा याठिकाणी लहान-मोठे अपघात घडत आहेत. रेल्वे प्रशासनाने लक्ष देवून ही समस्या कायमस्वरुपी निकाली काढावी, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

अंडरपासमध्ये उतरताना तसेच इटारसी लाइनकडून मिलिटरी स्टेशनकडे चढताना, अशा दोन्ही बाजूंनी समोरुन येणारे वाहन चालकांना दिसत नाही. येथे संपूर्ण एल आकाराचे वळण असल्याने या ठिकाणी बर्हिवक्र आरसे बसवणे आवश्यक आहे. जेणेकरून समोरुन येणारे वाहन दिसल्यामुळे अपघात टाळता येतील.

# गेल्या दोन पंचवार्षिकपासून जिल्ह्यातील सर्व मतदारसंघांची मतदानाची टक्केवारी ७०च्या आत

## जळगाव शहर मतदारसंघाची तीन पंचवार्षिकमधील सरासरी केवळ ४६ टक्केच

जळगाव : जिल्ह्यात गेल्या दोन विधानसभा निवडणुका व तीन लोकसभा निवडणुकांपासून मतदानाची टक्केवारी ७० च्या पुढे गेलेली नाही. लोकशाहीमध्ये जनतेचा सहभाग वाढविणे गरजेचे आहे. मात्र, गेल्या तीन विधानसभा निवडणुकांमधील मतदानाची टक्केवारी पाहिली, तर केवळ २००९ मध्ये २ मतदारसंघ वगळले, तर २०१४ व २०१९ मध्ये एकाही मतदारसंघातील टक्केवारी ७० च्या पार गेलेली नाही.


मध्ये अनुक्रमे ७१ व ७२ टक्के मतदान झाले होते. मात्र,

गेल्या तीन पंचवार्षिकमधील मतदानाची सरासरी

| ६५ टक्क्यांपेक्षा जास्त मतदानाची सरासरी | | ६० ते ६५ टक्क्यांपर्यंत मतदानाची सरासरी | |
|---|---|---|---|
| १. जामनेर | ६९.६८ टक्के | १. पाचोरा | ६४.७३ टक्के |
| २. मुक्ताईनगर | ६९.४५ टक्के | २. जळगाव ग्रामीण | ६४.११ टक्के |
| ३. रावेर | ६६.२८ टक्के | ३. एरंडोल | ६४.१ टक्के |
| ४. चोपडा | ६५.२२ टक्के | ४. चाळीसगाव | ६२.७९ टक्के |
| | | ५. अमळनेर | ६१.८६ टक्के |

५५ टक्क्यांपेक्षा कमी मतदानाची सरासरी

| भुसावळ | जळगाव |
|---|---|
| ५२.२ टक्के | ४६.६ टक्के |




त्यानंतर या मतदारसंघासह इतर सर्व मतदारसंघांमध्ये मतदानाची टक्केवारी फारशी वाढलेली दिसून येत नाही.

ग्रामीण भागातील जनतेचाही समावेश आहे, तर केवळ जळगाव शहर मतदारसंघात संपूर्णपणे शहरी भागातील मतदार आहेत. मात्र, जळगाव शहराचा विचार केला तर गेल्या तीन विधानसभा निवडणुकीत जळगाव शहरातील मतदानाची टक्केवारीची सरासरी ही केवळ ४६ टक्के एवढी आहे. २००९ मध्ये जळगाव शहरात केवळ ३९ टक्के मतदान झाले. २०१४ मध्ये ५५.७४ टक्के, तर २०१९ च्या विधानसभेच्या निवडणुकीतही केवळ ४५ टक्के मतदान झाले होते. शहरी भाग असूनही या मतदारसंघात ६० टक्क्यांपर्यंतही मतदान झालेले नाही.

# वृध्द, दिव्यांग मतदारांसाठी होणार गृह मतदान

धुळे : विधानसभा निवडणुकीत जास्तीत जास्त मतदान व्हावे, यासाठी जिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी जितेंद्र पापळकर यांच्या मार्गदर्शनाखाली शासकीय यंत्रणेने नियोजन केले आहे. भारत निवडणूक आयोगाने ८५ वर्षांपुढील, अंथरुणाला खिळलेले व दिव्यांग मतदार जे मतदान केंद्रापर्यंत जाऊ शकणार नाहीत. त्यांच्यासाठी गृह मतदानाची सुविधा उपलब्ध करुन दिली आहे. त्यानुसार, साक्रीत दि.८ व ९ रोजी, शिंदखेड्यात ९ व १० रोजी तर धुळे ग्रामीणमध्ये दि.१० रोजी गृहमतदानाची प्रक्रिया राबविण्यात येणार आहे. त्यासाठी पथके सज्ज ठेवण्यात आली आहेत.

३४८ मतदार जावून मतदान असलेल्या कर्मचाऱ्यांची टीम असणार आहे, अशी माहिती निवडणूक निर्णय अधिकारी बालाजी क्षीरसागर, सहाय्यक निवडणूक अधिकारी साहेबराव सोनवणे यांनी दिली आहे.

**शिंदखेड्यात १८८ वृद्ध, दिव्यांग मतदार**

शिंदखेडा विधानसभा मतदार संघातील ८५ वर्षांपेक्षा जास्त वयाचे, दिव्यांग मतदारांची आपआपल्या कार्यक्षेत्रातील बीएलओंनी नोंद करून अर्ज भरून घेतले आहेत. यापैकी मतदान केंद्रात जावून मतदान करणे शक्य नसलेल्या मतदारांची संख्या १८८ एवढी आहे. यात ८५ वर्षावरील १५५ मतदार असून ३३ दिव्यांग मतदारांचा समावेश आहे. या सर्व वृद्ध मतदारांच्या घरी जावून मतदान घेतले जाणार आहे. यासाठी शिंदखेड्यात ९ व १० नोव्हेंबरला सकाळी ८ ते सायंकाळी ६ वाजेपर्यंत ही प्रक्रिया राबवण्यात येईल. तर या तारखेस अनुपस्थित असलेल्या मतदारांसाठी १५ नोव्हेंबर रोजी मतदान घेतले जाणार आहेत. त्यासाठी १६ पथके तयार करण्यात आली असून यापैकी २ पथके राखीव ठेवण्यात आली आहे. या प्रत्येक पथकामध्ये दोन मतदान अधिकारी, एक पोलीस कर्मचारी, एक सूक्ष्म निरिक्षक तर एक व्हीडीओग्राफर अशी ५ कर्मचाऱ्यांची टीम असणार आहे, असेही निवडणूक निर्णय अधिकारी महादेव खेडकर यांनी कळविले आहे.

**धुळे ग्रामिणमध्ये ११६ वृद्ध, दिव्यांग मतदार**

धुळे ग्रामीण विधानसभा मतदार संघातील ८५ वर्षांपेक्षा जास्त वयाचे, दिव्यांग मतदारांची आपआपल्या कार्यक्षेत्रातील बीएलओंनी नोंद करून अर्ज भरून घेतले आहेत. यापैकी मतदान केंद्रात जावून मतदान

करणे शक्य नसलेल्या मतदारांची संख्या ११६ एवढी आहे. यात ८५ वर्षावरील ९९ मतदार असून १७ दिव्यांग मतदारांचा समावेश आहे. या सर्व वृद्ध मतदारांच्या घरी जावून मतदान घेतले जाणार आहे. यासाठी १० नोव्हेंबरला सकाळी ८ ते सायंकाळी ६ वाजेपर्यंत ही प्रक्रिया राबवण्यात येईल. तर या तारखेस अनुपस्थित असलेल्या मतदारांसाठी १५ नोव्हेंबर रोजी मतदान घेतले जाणार आहेत. त्यासाठी ९ पथके तयार करण्यात आली असून यापैकी १ पथके राखीव ठेवण्यात आली आहे. या प्रत्येक पथकामध्ये दोन मतदान अधिकारी, एक पोलीस कर्मचारी, एक सूक्ष्म निरिक्षक तर एक व्हीडीओग्राफर अशी ५ कर्मचाऱ्यांची टीम असणार आहे, अशी माहिती निवडणूक निर्णय अधिकारी रोहन कुवर यांनी दिली आहे.

# धुळे जिल्हा परिषदेतील 'लिफ्ट' बंदच दिव्यांग अभ्यागतांचे हाल

## दोन मजले चढून जावे लागते समाज कल्याण विभागात

धुळे-जिल्हा परिषदेत मोठ्या प्रतीक्षेनंतर लिफ्ट बसविण्यात आल्यानंतर सप्टेंबर महिन्यात मोठ्या थाटात उद्घाटनाचा समारंभ देखील पार पडला; तरी आजही बहुप्रतिक्षित लिफ्ट बंदच असून जिल्हा परिषदेत कामानिमित्त येणाऱ्या दिव्यांग अभ्यागतांना दोन मजले चढून समाज कल्याण विभागात जावे लागत असल्याने त्यांचे मात्र हाल होत आहेत.

जिल्हा परिषदेच्या मुख्य इमारतीत बऱ्याच वर्षांच्या प्रदीर्घ प्रतीक्षेनंतर लिफ्ट बसविण्यात आली; पण सध्या स्थितीत ही लिफ्ट बंद असल्याने दिव्यांग नागरिकांचे हाल होत आहेत. फेब्रुवारी २०२४ मध्ये लिफ्टच्या कामाला सुरुवात करण्यात आली होती. एप्रिल २०२४ महिन्यापर्यंत लिफ्टचे संपूर्ण काम पूर्ण झाले. मात्र लिफ्टसाठी स्वतंत्र वीज मीटर घ्यावे लागत असल्याने वीज मंडळाकडे प्रस्ताव पाठवला होता. त्यातच मे




महिन्यापासून निवडणुकांची आचार संहिता सुरू असल्याने लिफ्ट सुरू करण्याचा विषय मागे पडला. त्यानंतर सप्टेंबर महिन्यात लिफ्ट सुरू करण्याचा मुहुर्त काढण्यात आला. मोठा गाजवाजा करत १३ सप्टेंबर उद्घाटनाचा समारंभ देखील पार पडला. परंतु, केवळ फोटो सेशन करण्याइतकेच या समारंभाला महत्व लाभले होते. तेव्हापासून जिल्हा परिषदेत लावलेली लिफ्ट बंदच आहे. जिल्हा परिषदेच्या मुख्य प्रशासकीय इमारतीला तळमजल्यासह पहिला आणि दुसरा असे तीन मजले असून चौथ्या मजल्यावर ग्रामीण पाणी पुरवठा विभागाची तांत्रीक शाखा कार्यरत आहे. दररोज विविध कामांसाठी दिव्यांग अभ्यागत,

जिल्हा परिचय, सेवानिवृत्त कर्मचारी, ज्येष्ठ नागरिक जिल्हा परिषदेत विविध कामांनिमित्त येत असतात. त्यांना पहिल्या, दुसऱ्या आणि तिसऱ्या मजल्यावर जिणे चढून जातांना मोठे कष्ट पडतात. त्यातच सर्व महत्वाचे विभाग पहिला आणि दुसऱ्या मजल्यावर आहेत. मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांचे दालन पहिल्या मजल्यावर आहे. याशिवाय, ग्रामपंचायत विभाग, सामान्य प्रशासन विभाग व जलसंधारण विभाग याच मजल्यावर आहे. महत्वाचे म्हणजे कृषी सभापती आणि महिला व बाल कल्याण सभापतींची दालने देखील पहिल्या मजल्यावर आहेत. सभापतींकडे विविध कामांसाठी नेहमीच नागरिकांचा राबता असतो. आरोग्य विभाग, अर्थ विभाग, पाणी पुरवठा विभाग, बांधकाम विभाग आणि महत्वाचा दिव्यांग कर्मचारी, म्हणजे समाज कल्याण विभाग तिसऱ्या मजल्यावर आहे.

समाज कल्याण विभागात येणारे दिव्यांग आणि ज्येष्ठ नागरिकांना दोन मजले जिना चढून वर जावे लागते. त्यांच्या अडचणी लक्षात घेवून कर्मचारी संघटना, सामाजिक संघटना, दिव्यांग संघटनांकडून जिल्हा परिषदेत लिफ्ट बसविण्याची मागणी अनेक वर्षापासून केली जात होती. अखेर समाज कल्याण विभागाने जिल्हा परिषदेत लिफ्ट सुरू करण्यासाठी ३८ लाखांचा निधी उपलब्ध करून दिला. यामुळे मोठ्या प्रतीक्षेनंतर लिफ्ट बसविण्यात आली आहे. सध्या ही लिफ्ट बंद असल्याने दिव्यांग आणि नागरिकांकडून नाराजी व्यक्त केली जात आहे. लिफ्ट सुरू करायचीच नव्हती तर एवढा खर्च आणि उद्घाटनाचे सोपस्कर कशासाठी करण्यात आले? असा प्रश्न देखील जनमानसातून विचारला जात आहे.

# धावत्या रेल्वेतही करडी नजर; सीसीटीव्ही कॅमेऱ्यांची घेतली जातेय मदत

## सणाच्या काळात रेल्वेत गर्दी वाढली; पोलिसांची प्रत्येक डब्यात गस्त

भुसावळ - दिवाळी सणाच्या पार्श्वभूमीवर प्रवाशांची गर्दी पाहता रेल्वे सुरक्षा बलाने रेल्वे प्रवाशांच्या सुरक्षेसाठी विशेष काळजी घेतली जात आहे. दरम्यान, सीसीटीव्ही कॅमेऱ्यांच्या माध्यमातून प्रत्येक घटनांवर पाळत ठेवली जात आहे. याशिवाय रेल्वे आणि स्थानकांवर आरपीएफ जवानांकडून गस्त वाढविण्यात आली असून, रेल्वे गाड्यांमधील प्रत्येक कोच, डब्यात सुरक्षा बलाचे जवान २४ तास गस्त घालून प्रवाशांना सुरक्षित, आनंदी प्रवास घडविण्यास मदत करीत आहेत. दरम्यान, सणासुदीच्या गर्दीत, सुरक्षित प्रवास सुनिश्चित करण्यासाठी आणि कोणतीही सामान आणि प्रवाशांची नियमित तपासणी कोणताही अनुचित प्रकार घड्ङ्ग नये, यासाठी प्रत्येक रेल्वे स्थानकावर प्रवाशांकडे असलेले सामान व प्रवाशांची तपासणी करण्यात येत आहे. शिवाय स्थानक व गाड्यांमधील अनोळखी वस्तूंवर विशेष लक्ष ठेवण्यात येत आहे. अपघात आणि गुन्हे रोखण्याच्या उद्देशाने आरपीएफ पोलिसांनी कंबर कसली आहे.

मध्यंतरी भुसावळ लोहमार्ग पोलिस व आरपीएफ जवानांनी खून २ करून फरार। होत असलेल्या आरोपींना ताब्यात घेतले होते, याशिवाय स्कॅनर मशीनवर गांजाही जप्त करण्यात आला होता. सातत्याने कारवाया सुरूच आहे.अनुचित घटना टाळण्यासाठी रेल्वे प्रयत्न करीत आहे. दिवाळी सणामुळे भुसावळ विभागातून धावणाऱ्या प्रत्येक गाड्यांमध्ये प्रवाशांची संख्या वाढली आहे. प्रत्येक मेल, एक्स्प्रेस, डेमू, पॅसेंजर गाड्यांना प्रमाणापेक्षा जास्त गर्दी दिसून येत आहे. वाढत्या गर्दीत

प्रवाशांचा प्रवास सुरक्षित व्हावा, यासाठी रेल्वे सुरक्षा बलाचे जवान अहोरात्र काम करीत आहेत. दरम्यान, रेल्वेच्या आवारात कोणतेही संशयास्पद पदार्थ आढळल्यास किंवा संशयित व्यक्ती आढळून आल्यास १३९ या हेल्पलाइनवर संपर्क करावा. ज्वलनशील वस्तू किंवा संशयास्पद वस्तू किंवा व्यक्ती गाड्यांमध्ये किंवा स्थानकांवर आढळल्यास आरपीएफ, जीआरपी कर्मचारी किंवा रेल्वे अधिकाऱ्यांना त्वरित कळवा. मौल्यवान वस्तू जवळ आणि नजरेसमोर ठेवा, प्रवासात सुरक्षिततेसाठी डिजिटल पेमेंट निवडा. मुले प्रौढांसोबत असतील, याची खात्री करा. घोषणांकडे लक्ष द्या आणि रेल्वे कर्मचाऱ्यांच्या सूचनांचे पालन करा.

## जैन हिल्स येथे फिडे आरबिटर सेमिनाराची सुरवात




जळगाव -अखिल भारतीय बुद्धिबळ महासंघातर्फे जळगाव जिल्हा बुद्धिबळ संघटनेला फिडे आरबिटर सेमिनार घेण्याची जबाबदारी देण्यात आली. त्यानुसार जैन इरिगेशन सिस्टीम्स लि. व जैन स्पोर्टस ॲकडमी यांच्या सहकार्यातून दि. ८ ते १० नोव्हेंबर असा तीन दिवस हा सेमिनार राहणार आहे.

जैन हिल्सच्या सुबिर बोस हॉल येथे सुरू असलेल्या सेमिनारमध्ये अखिल भारतीय बुद्धिबळ महासंघातर्फे केरळचे आंतरराष्ट्रीय पंच व जागतिक शिस्त पालन समितीचे सदस्य एम. एस. गोपाकुमार यांची विशेष मार्गदर्शनासाठी निवड करण्यात आली. त्यांच्या मार्गदर्शनात बुद्धिबळ विषयातील विविध नियम, नियमावली यावर मुख्यत्वे करुन प्रकाश टाकण्यात येणार आहे. संपूर्ण भारतातून महाराष्ट्र, आंध्रप्रदेश, राजस्थान, तामिळनाडू, तेलंगणा, सौराष्ट्र, बिहार, दिल्ली राज्यातून निवडक असे २२ राष्ट्रीय बुद्धिबळ पंचाची निवड महासंघाद्वारे या सेमिनारसाठी केली आहे. फिडे मानांकन प्राप्त करण्यासाठी सेमिनार महत्त्वपूर्ण आहे. सेमिनार मध्ये सहभागी राष्ट्रीय बुद्धिबळ पंचाची समारोपाच्या दिवशी परिक्षा घेण्यात येईल, यात यशस्वी पंचांना फिडे पंच असे मानांकन देण्यात येईल. जळगाव जिल्हा बुद्धिबळ संघटनचे सचिव नंदलाल गादिया, खजिनदार अरविंद देशपांडे, सहसचिव संजय पाटील, सदस्य रवींद्र धर्माधिकारी, आंतरराष्ट्रीय बुद्धिबळ पंच प्रविण ठाकरे यांच्यासह जैन इरिगेशन व जैन स्पोर्टस ॲकडमीच्या सहकारी यशस्वीतेसाठी सहकार्य करत आहेत.

## के सी ई सोसायटीचे कॉलेज ऑफ इंजिनीरिंग अँड मॅनेजमेंट महाविद्यालयात ॲग्री अस्पायर २०२४ कार्यक्रम संपन्न

जळगाव : के सी ई सोसायटीचे कॉलेज ऑफ इंजिनीरिंग अँड मॅनेजमेंट महाविद्यालयांत ॲग्री अस्पायर २०२४ कार्यक्रम दिनांक ७ ऑक्टो २०२४ ला सकाळी १० वा . ॲग्री बिझनेस मॅनेजमेंट च्या विद्यार्थ्यांसाठी ॲग्री अस्पायर २०२४ चे आयोजन केले होते . कार्यक्रमाच्या वेळी के सी इ महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ संजय सुगंधी यांचे हस्ते उदघाटन करण्यात आले . या कार्यक्रमा मध्ये विद्यार्थ्यांना पाच विषय देण्यात आले होते १)न्यू अग्री टेकनॉलॉजि २)रिन्यूएबल एनर्जि ३)वॉटर मॅनेजमेंट ४)ए.आय इन अग्रीकल्चर ५)क्लायमेंट स्मार्ट अग्रीकल्चर. या विषयावर विद्यार्थ्यांनी सादरीकरण केले .या कार्यक्रमात एस्पायर न १ टीम ने ऑरगॅनिक फॉर्मिंग चे फायदे,एस्पायर न २ टीम ने ओनियान पावडर विथ सोलर



सिस्टम, एस्पायर न ३ टीम ने व्हर्टिकल फॉर्मिंग,एस्पायर न ४ टीम ने रिजनरेटिव्ह फॉर्मिंग,एस्पायर न ५ टीम ने न्यू अग्री टेकनॉलॉजि -डेट्स कॉफी,एस्पायर न ६ टीम ने वर्मिंगपोस्ट ऑरगॅनिक मॅन्युअर अश्या वेगवेगळ्या संकल्पनेवर अतिशय उत्कृष्टपणे सादरीकरण केले.या कार्यक्रमासाठी दीपक माळी व हर्ष कोटेचा यांनी विद्यार्थी प्रतिनिधी तसेच प्रा.रवींद्र स्वामी यांनी शिक्षक समन्व्यक म्हणून जबाबदारी भूषवली.कार्यक्रमाच्या शेवटी प्राचार्य डॉ संजय सुगंधी यांनी विद्यार्थ्यांना कौशल्यभिमुख स्टार्टूर्स अप वर भर दिल्यास आपला देश रोजगार निर्मितीत जगात अग्रेसर असेल असे प्रतिपादन केले.विद्यार्थ्यांनी केलेल्या कार्यांची प्राचार्यांनी कौतुक केले.या मुळे विद्यार्थ्यांना भविष्यात नवीन तंत्रज्ञाना विषयी विचार करण्याची क्षमता विकसित करण्यास मदत झाली.कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी डॉ वीणा भोसले (विभाग प्रमुख,अग्री बिझनेस मॅनेजमेंट)यांनी मेहनत घेतली.कार्यक्रमाला प्रा.हर्षा देशमुख,प्रा.शेफाली अग्रवाल,प्रा.गोडबोले,प्रा.तनया भाटिया,प्रा.डिगंबर सोनवणे,प्रा. हेमंत धनंधरे,प्रा.देवेंद्र पाटील प्रा.रेवती पाटील उपस्थित होते.

## विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीच्या मतदानासाठी २० नोव्हेंबर रोजी सुट्टी जाहीर

जळगाव ( जिमाका ) भारत निवडणूक आयोगाने १५ ऑक्टोबर रोजी महाराष्ट्र राज्यातील विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ चा कार्यक्रम जाहीर केला आहे. यानुसार २० नोव्हेंबर रोजी महाराष्ट्र विधानसभा निवडणूकीचे मतदान पार पडणार आहे. निवडणुकीत जास्तीत जास्त लोकांना आपला मतदान हक्क बजावता यावा या करीता २० नोव्हेंबर रोजी सार्वजनिक सुट्टी जाहीर करण्यात आली आहे. विधानसभा मतदारसंघातील मतदारांना मतदानाच्या दिवशी मतदान करण्यासाठी सुट्टी देण्यात यावी अशा सुचना कार्यसन अधिकारी शामकांत सोनवणे यांनी एका परित्रकाद्वारे दिल्या आहे.

निवडणूक होणा-या मतदान क्षेत्रातील कोणत्याही व्यवसायात, व्यापारात, औद्योगिक उपक्रमात किंवा इतर कोणत्याही आस्थापना तसेच उद्योग विभागांतर्गत येणा-या सर्व उद्योग समूह, महामंडळे, कंपन्या व संस्था, औद्योगिक उपक्रम किंवा इतर आस्थापनेमध्ये कार्यरत असलेल्या तसेच राज्याच्या विधानसभेच्या निवडणुकीत मतदान करण्याचा अधिकार असलेल्या प्रत्येक व्यक्तीला, मतदानाच्या दिवशी सुट्टी दिली जाणार आहे. सुट्टीच्या कारणास्तव कोणत्याही व्यक्तीच्या वेतनात कोणतीही कपात केली जाणार नाही. जर एखाद्या नियोक्त्याने या तरतुदींचे उल्लंघन केले, तो नियोक्ता निवडणूक आयोगाच्या नियमानुसार शिक्षेस पात्र असणार आहे. ज्यांच्या अनुपस्थितीमुळे तो ज्या रोजगारामध्ये गुंतला आहे त्या रोजगाराच्या संदर्भात धोका किंवा मोठ्या प्रमाणात नुकसान होऊ शकते अशा मतदाराला हे कलम लागू होणार नाही. अपवादात्मक परिस्थितीत कामगार, अधिकारी, कर्मचारी इत्यादींना पूर्ण दिवस सुट्टी देणे शक्य नसेल तर, मतदान क्षेत्रातील सुट्टी ऐवजी कमीत कमी दोन तासांची सवलत देण्यात यावी. मात्र यासाठी त्याबाबत संबंधित जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी यांची पूर्व परवानगी घेणे आवश्यक असणार आहे. मतदारांकडून मतदानाकरिता योग्य ती सुट्टी अथवा सवलत प्राप्त न झाल्याने मतदान करता येणे शक्य न झाल्याबाबत तक्रार आल्यास, त्यांच्याविरुद्ध योग्य कारवाई करण्यात येणार आहे.

## निवडणूक काळात आटलाय दारूचा पूर; तपासणीतून जुळतोय कारवाईचा सूर ! धुळे जिल्ह्यात २२ दिवसांत १५ हजार लिटर दारूसाठा जप्त; ४८ जणांवर गुन्हे दाखल

नंदुरबार : विधानसभा निवडणुकीची आदर्श आचारसंहिता लागू झाल्याने प्रशासनाकडून अवैध धंद्यांवर कारवाईचे सत्र सुरु करण्यात आले आहे. याअंतर्गत जिल्ह्यात राज्य उत्पादन शुल्क विभागाने २२ दिवसांत केलेल्या कारवाईतून तब्बल १५ हजार देशी-विदेशी दारूचा साठा जप्त करण्यात आला आहे. यातील निम्मा दारूचा साठा हा गोवा आणि मध्य प्रदेशातून आणला गेल्याचे निदर्शनास आल्यानंतर जप्तीची कारवाई करण्यात आली आहे. या कारवाईमुळे निवडणूक काळात दारूचा वाहणारा पूर काहीअंशी आटोक्यात आल्याची स्थिती आहे.

ऑक्टोबर महिन्यात आदर्श आचारसंहिता लागू करण्यात आल्यानंतर जिल्हाधिकारी डॉ. मिताली सेठी यांच्या आदेशाने राज्य उत्पादन - शुल्क विभागाकडून नियमित तीन - तपासणी नाक्यांसह तीन तात्पुरत्या चेकपोस्ट सुरु करण्यात आल्या होत्या. याअंतर्गत १५ ऑक्टोबर ते ६ नोव्हेंबर या २२ दिवसांच्या कालावधीत जिल्ह्यात अवैध दारु वाहतूक आणि साठा करणाऱ्यांवर कारवाई करण्यातआली आहे. १५ ऑक्टोबरपासून उत्पादन शुल्क विभागाने एकूण ४९ कारवाया केल्या आहेत. यातून ७९ लाख ४१ हजार ९७५ रुपयांचा अवैध देशी-विदेशी दारूसाठा जप्त झाला होता. १५ हजार ५६३ लिटर अशा या साठ्यापैकी ८ हजार ९१७ लिटर दारु ही परराज्यातून वाहनांमधून आणली जात होती. एकूण १६ वाहनांमधून आणली गेलेली ही दारु पकडून ४८ संशयितांवर विभागाने कारवाई करत गुन्हे दाखल केले आहेत.

राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या नंदुरबार कायमस्वरुपी तीन चेकपोस्ट आहेत. त्यात मध्यप्रदेश सीमेवर खेडदिगर (ता. शहादा), तर गुजरात सीमेवर बेडकीपाडा (ता. नवापूर) आणि गव्हाळी (ता. अक्कलकुवा) यांचा समावेश आहे. निवडणूक काळात अवैध दारूची वाहतूक टाळण्यासाठी गुजरात हद्दीलगत उकळापाणी (ता. नवापूर), पथराई (ता. नंदुरबार) आणि मध्यप्रदेश हद्दीलगत शहाणा (ता. शहादा) याठिकाणी चेकपोस्ट तयार करण्यात आले आहेत.

## उत्कृष्ट आरोग्य सेवा पुरविण्यात धुळे जि.प. आरोग्य विभाग राज्यात पाचवा अकोला प्रथम क्रमांकावर तर जळगाव १३ व्या स्थानी

धुळे : ग्रामीण भागात आरोग्य केंद्राच्या मार्फत विविध प्रकारच्या आरोग्यदायी सेवा पुरविण्यात धुळे जिल्हा परिषदेच्या आरोग्य विभागाने राज्यात पाचवा क्रमांक पटकाविला आहे. राज्याच्या आरोग्य सेवा आयुक्तालयाने नुकतेच सप्टेंबर महिन्याचे रैंकिंग जाहीर केले असून, त्यात धुळ्याने पाचवा क्रमांक तर प्रथम क्रमांक अकोला विभागाने पटकाविला आहे. तसेच जळगाव जिल्हा परिषदेच्या आरोग्य विभागाने तेरावा क्रमांक पटकाविला असून, नंदुरबार थेट १४ व्या स्थानी आहे.

शासन गेल्या काही वर्षांत ग्रामीण भागातील नागरिकांचे जीवनमान - उंचावण्यासाठी विविध योजना राबवीत असून, दुसरीकडे त्यांचे आरोग्यमान सुदृढ ठेवण्यासाठींही जिल्हा

परिषदेच्या आरोग्य विभागाच्या माध्यमातून विविध उपाययोजना राबवीत आहे. यामध्ये माता बाल संगोपन योजनेच्या माध्यमातून महिला व बाळाचे आरोग्य सुदृढ राखणे, लसीकरण, कुटुंब कल्याण, किशोरवयीन कार्यक्रम, आर. सी. एच. पोर्टल, एकात्मिक आरोग्य सर्वेक्षण कार्यक्रम, राष्ट्रीय तंबाखू नियंत्रण कार्यक्रम, आयुष्यमान आरोग्य मंदिर, कुष्ठरोग निवारण अशा प्रकारे विविध उपक्रम आरोग्यसेवक व आशा स्वयंसेविकांच्या माध्यमातून राबवून धुळे जिल्हा परिषदेच्या आरोग्य विभागाने ग्रामीण भागातील नागरिकांचे जीवन ठणठणीत ठेवले आहे.

दरम्यान, शासनाच्या आरोग्य संदर्भातील विविध योजना तळगाळापर्यंत पोहचविण्याचे काम प्रशासकीय यंत्रणेकडून वेळोवेळी सुरु असते. त्याचेदेखील अवलोकन यानिमित्ताने करण्यात आले आहे.

जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विशाल नरवाडे यांच्या मार्गदर्शनाखाली गेल्या वर्षीपासून आम्ही टॉपटेनमध्ये आहोत. याचा आम्हाला सार्थ अभिमान असून, यापुढेही नागरिकांना उत्कृष्ट आरोग्यसेवा देण्यात आमचा आरोग्यविभाग कटिबद्ध राहणार आहे. असे डॉ. सचिन बोडके, जिल्हा आरोग्याधिकारी, धुळे यांनी बोलतांना सांगितले.

## स्वामी विवेकानंदांच्या विचारांची गरज -खगेंद्र महाराज; मतदान करण्याबाबत जनजागृती

धुळे : मुला-बाळांना गंध लावण्याची लाज वाटते. हे संस्कार आपल्या मुलांना अवश्य द्या. तोंडामध्ये राम बसणं गरजेचे आहे. माझ्या धर्माविरुद्ध बोलाल तर उचलून समुद्रात फेकून देईन, अशा विवेकानंदांच्या विचारांची आज देशाला गरज आहे. असे विचार रामायणाचार्य हभप. खगेंद्र महाराज यांनी व्यक्त केले.

आता युद्ध करायची वेळ आहे. म्हणजे हातात तलवारी घ्यायची नाही तर योग्य ठिकाणी बटण दाबायचे, धर्माला जपण्यासाठी हे गरजेचे आहे. त्यामुळे धर्माला सांभाळा, असे आवाहन खगेंद्र महाराजांनी केले.

शहरातील देवपूर भागातील श्रीरंग कॉलनीतील प्लॉट क्र. ५३ मध्ये आयोजित संगीतमय श्रीराम कथा ज्ञानयज्ञ सोहळ्याचे



तिसरे पुष्प गुंफताना हभप खगेंद्र महाराज बोलत होते. गुरुवारी रामजन्म कथेचा विषय होता. शहाण्यांना जगण्यासाठी येथे काटेकोर कायदे आहेत. थोडे वेडं बनून रहा, इथे खूप फायदे आहेत. त्यावर उदाहरण देताना महाराज म्हणाले, जर एखादा वेडा व्यक्ती महामार्ग ओलांडत असेल तर सर्व वाहने थांबून जातील आणि म्हणतील, हा वेडा आहे, त्याला जाऊ

प्रवचनात सादर केलेल्या गितावर नृत्य सादर करताना भाविक महिला.

मतदानाबाबत प्रबोधन

प्रवचनाच्या निमित्ताने परिसरातून भाविकांची मोठ्या प्रमाणावर उपस्थिती आहे. विधानसभेसाठी २० रोजी मतदान आहे. जास्तीत जास्त मतदान करण्यासाठी मतदारांनी पुढे यावे, असे आवाहन करण्यात आले.

द्या आधी. मात्र, त्याच जागेवर जर चांगला अपटूडेट व्यक्ती जात असला तर लोक त्याला शिव्या देतील, साहेब दिसतो, अक्कल नाही का... त्यामुळे शहाण्यांना जगण्यासाठी काटेकोर कायदे आहेत, म्हणून थोडं वेडं बनून राहा, इथे खूप फायदे आहेत. त्यामुळे परमार्थातले वेडे बना, लोकांनी शेवटी म्हटलं पाहिजे, याला देवाधर्माचं फार वेड होतं.

राम मंत्रासारखा दुसरा मंत्र नाही.

तुलसीदास म्हणतात, जहां राम है वहा काम नहीं और जहा काम है वहां राम नहीं.

लग्नानंतर पूर्वी पद्धत अशी होती, भक्त देवदर्शनाला जात होते. आता देवदर्शन हा विषय गौण झाला आहे. आपण मुलांना संस्कार दिले पाहिजे, त्याची गरज आहे.

माणसाने जप करावा, भक्तीही करावी. राम अवतार का झाला, याचीही सुंदर गोष्ट यावेळी हभप खगेंद्र महाराज यांनी दिली.

## कॉलर आयडीच्या माहितीवर विश्वास ठेवू नका फसवणूक होईल-सरकारी अधिकाऱ्यांना सायबर दिनशानिर्देश

नवी दिल्ली: देशात गोपनीय वैयक्तिक माहिती मिळवण्याच्या उद्देशाने आणि अधिकृत प्रणालींमध्ये अवैधरीत्या प्रवेश मिळवण्याच्या उद्देशाने 'विशिंग' हल्ल्यांमध्ये वाढ झाली आहे. त्यामुळे फोन कॉल येताच कॉलर आयडीवरील माहितीवर विश्वास ठेवू नये. यामुळे तुमची फसवणूक होऊ शकते, असा मौलिक सल्ला सायबर सुरक्षा सल्लागाराने शासकीय अधिकाऱ्यांना दिला आहे.

शासकीय अधिकाऱ्यांसाठी सायबर धोक्यांपासून सावध राहण्याचे दिशानिर्देश राष्ट्रीय माहिती केंद्राने (एनआयसी) जारी केले. एनआयसीने विविध सरकारी विभाग व मंत्रालयांना पाठवलेल्या दिशानिर्देशांमध्ये म्हटले आहे की, हल्लेखोर वरिष्ठ सरकारी अधिकारी, कायद्याची अंमलबजावणी करणाऱ्या संस्था किंवा तांत्रिक सहायक कर्मचाऱ्यांसारख्या विश्वसनीय संस्थांचे रूप धारण करू शकतात. आपण कॉल केलेला क्रमांक हा वैध सरकारी आहे, हे भासवण्यासाठी हल्लेखोर कॉलर आयडीच्या माहितीत हेराफेरी करतात. देशात गोपनीय माहिती मिळवणे व अधिकृत प्रणालींमध्ये अनधिकृतपणे पोहोचण्यासाठी सरकारी अधिकाऱ्यांना निशाणा सरकारी अधिकाऱ्यांना सायबर दिशानिर्देश जारी बनवण्यासाठी



'विशिंग हल्ले' वाढले आहेत. म्हणूनच आम्ही अधिकाऱ्यांना सावध करीत असल्याचे एनआयसीने स्पष्ट केले. पीडितांना गोपनीय माहिती देण्याच्या उद्देशाने प्रलोभन दाखवण्यासाठी फसवणुकीचे कॉल किंवा व्हॉईस मेसेजचा अनधिकृत वापर करणे हे 'विशिंग सायबर' हल्ल्याचे एक रूप आहे. अत्यंत तातडीचा संदेश देणे, लक्षित व्यक्तीला माहिती देण्यासाठी बाध्य करणे, जर आमची माहिती स्वीकारली नाही तर गंभीर परिणाम भोगण्याची धमकी देणे किंवा भ्रमित किंवा भीती घालण्यासाठी गुंतागुंतीची भाषा वापरण्याच्या रणनीतीचा वापर हल्लेखोर करू शकतात. कॉलर आयडीवर दिसणाऱ्या माहितीवरून सहजपणे फसवणूक केली जाऊ शकते. त्यामुळे सरकारी अधिकाऱ्यांनी यापासून सावध राहावे, असे आवाहन एनआयसीने केले. एखादा कॉल आल्यानंतर त्या क्रमांकावर पटकन विश्वास ठेवू नका. अधिकृत रेकॉर्डसह संबंधित एजन्सीचे प्रतिनिधित्व करण्याचा दावा करणाऱ्या कोणत्याही कॉलरची पडताळणी करण्याचा सल्लासुद्धा एनआयसीने अधिकाऱ्यांना दिला आहे. अधिकाऱ्यांनी संवेदनशील माहिती देण्यापूर्वी शासकीय यंत्रणेच्या माध्यमातून कॉल करणाऱ्याची ओळख पटवून घ्यावी. संशयित व्यक्तीद्वारे देण्यात आलेल्या माहितीची पुष्टी करण्यासाठी वेळ घ्यावा. कामाच्या वेळी किंवा इतर सुरक्षित सायबर संवादासाठी स्थापित मापदंडांचे पालन करण्याचा सल्ला एनआयसीने दिला.

## मनपाचे नागरिकांना आवाहन, बाजारपेठेत अतिरिक्त घंटागाड्या; कचरा इतरत्र फेकू नका, तक्रार नोंदवा..!

धुळे : दिवाळी आटोपली असली तरी बाजारपेठेत मोठ्या प्रमाणावर गर्दी आहे. परिणामी, बाजारात सुका कचराही मोठ्या प्रमाणावर निर्माण झालेला आहे. या पार्श्वभूमीवर महापालिकेने कंत्राटदारांच्या माध्यमातून मुख्य बाजारपेठेत कचरा संकलनासाठी अतिरिक्त घंटागाड्यांची व्यवस्था केलेली आहे. नागरिकांनी कचरा रत्स्यावर, सार्वजनिक ठिकाणी फेकू नये, घंटागाडी येत नसल्यास तक्रार नोंदवावी, असे आवाहन महापालिकेतर्फे करण्यात आले आहे. शहरात घनकचरा संकलनाचे काम स्वयंभू ट्रान्सपोर्ट कंपनीतर्फे करण्यात येत आहे. महापालिका आयुक्त तथा प्रशासक अमिता दगडे पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली उपायुक्त हेमंत निकम यांनी दिलेल्या कृती कचरा संकलनाची अतिरिक्त व्यवस्था करण्यात आली. दिवाळीनिमित्त खरेदीसाठी शहरातील मुख्य बाजारपेठ, आग्रा रोड व पाच कंदील या भागात नागरिकांची मोठ्या प्रमाणावर गर्दी होत असते. सकाळपासून ते अगदी रात्रीपर्यंत नागरिकांची गर्दी पाहायला मिळत आहे. त्याप्रमाणे मुख्य बाजारपेठेत सुका कचरा निर्माण होत आहे. हा कचरा तेथे पडून अस्वच्छता निर्माण होऊ नये यासाठी धुळे महापालिकेने कंत्राटदाराच्या माध्यमातून कचरा संकलनासाठी अतिरिक्त घंटागाडीची व्यवस्था केलेली आहे.सकाळच्या सत्रात एका घंटागाडीच्या चार फेऱ्या, तसेच ट्रॅक्टरद्वारे कचऱ्याचे संकलन करण्यात येत आहे. जेल रोड, कुमारनगर, दत्त मंदिर, पारोळा रोड, या ठिकाणीही अतिरिक्त घंटागाडीद्वारे कचरा संकलन करण्यात येत आहे, तसेच रात्रीच्या सत्रातही कचरा संकलनाचे काम करण्यात येत आहे. आपल्या घर, दुकानातून निघणारा कचरा महानगरपालिकेच्या घंटागाडीतच द्यावा. रस्त्यावर अथवा इतरत्र कचरा टाकू नये. आपल्याकडे घंटागाडी येत नसेल तर महापालिकेच्या जुन्या इमारतीमधील स्वयंभू ट्रान्सपोर्टच्या कार्यालयात तक्रार नोंदवावी. तक्रारीचे निवारण करण्यात येईल. त्याचप्रमाणे प्लास्टिक पिशव्यांचा वापर करू नये. बाजारासाठी कागदी किंवा कापडी पिशव्यांचा वापर करावा. महापालिकेस सहकार्य करावे, असे आवाहन मुख्य स्वच्छता निरीक्षक राजेश वसावे, स्वच्छता निरीक्षक विकास साळवे यांनी केले आहे.